
जगदिश खांदेवाले
दहावा मैल
10

# या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!

# दहावा मैल

## हे पुस्तक फुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो.

मजा येते.

## पण

## तुम्ही ते फुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हाला आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना आमच्याबद्दल मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# दहावा मैल

लेखक

जगदिश खांदेवाले

# दहावा मैल


## लेखक. . . जगदिश खांदेवाले

फ्लॅट नं ११३ शिवशंकर सोसायटी.
शिवतीर्थ नगर कोथरुड पुणे ४११०३८
मो. नं ९१५८६६१६३८
Email id – jlkhandewale@gmail. com



या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author’s copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com
esahity@gmail. com
Whatsapp: 9987737237
eSahity Pratishthan
eleventh floor
eternity
eastern express highway
Thane. 400604

**प्रकाशन : १३ ऑगस्ट २०२२**

©esahity Pratishthan®2022

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे



उद्यमी, न्याय, अनाहुत, पाया रचिता आणि भास-आभास या ई साहित्य प्रतिष्ठान तर्फे प्रकाशित झालेल्या माझ्या पाच कादंबऱ्यांना वाचकांनी उदंड प्रतिसाद दिल्याने मी ही सहावी कादंबरी सादर करीत आहे.


एखादा साधा सरळ माणूस जर नकळत अपरिचीत क्षेत्रात गुंतल्या गेला तर तेथील शह काटशहांवर उपजत चातुर्याने टिकेल, मात करील की हार मानेल? प्रत्यक्षात आपण बऱ्याच व्यक्ती अशा बघता ज्यांचे शिक्षण, प्रशिक्षण ज्या क्षेत्रात झाले असते त्याहून भिन्न क्षेत्रात ते काम करतात आणि यशस्वी होतात. निदान यशस्वी झालेल्यांची यशोगाथा आपल्याला माहिती असते. समजा एखादा सरळमार्गी माणूस अशा परिस्थितीत सापडला तर काय होईल? या एकाच सूत्रावर दहावा मैल ही कादंबरी आधारित आहे. माझ्या परीने मी उत्तर शोधायचा प्रयत्न केला आहे.

वाचा आणि तुमचेही मत जरूर कळवा. अनुकूलच असले पाहिजे असे जरुरी नाही. आपणास ही कादंबरी पण आवडेल अशी आशा करतो.

ई साहित्य प्रतिष्ठाचे श्री सुनील सामंत व त्यांचे सहकारी यांचे विशेष आभार.

. जगदिश खांदेवाले







# अर्पणपत्रिका

माझे नातू
चि. ओजस (वय वर्षे अकरा)
आणि चि. विराज (वय वर्षे चार)
चि. आदिराज (वय ४ महिने)
यांच्या सहकार्याशिवाय
मी एक शब्दही लिहू शकलो नसतो....

# दहावा मैल

या कादंबरीतील सर्व घटना, स्थळे व व्यक्ती काल्पनिक असून त्यांचा कोणाही व्यक्ती स्थळ वा घटनेशी साम्य आढळल्यास तो निव्वळ योगायोग मानावा.

# प्रकरण १

वातावरण निःशब्द होते. एक दुःखद तणाव जाणवत होता. लष्करी बँड मंद धून वाजवत होता. अचानक निवेदक शांत, सुस्पष्ट आवाजात निवेदन करू लागला.

“११ डिसेंबर १९७१ रोजी बांगलादेशच्या दोनशे परिचारिका मेघना येथील सिटी हॉस्पिटलमधे पाकिस्तानी लष्कराच्या वेढ्यात अडकल्या असतांना मेजर रणजित शिलेदार यांनी जिवाची पर्वा न करता त्यांची सुटका केली. या बद्दल त्यांना हे मरणोत्तर परमवीर चक्र प्रदान करण्यात येत आहे.” अजून पुढेही त्याचे निवेदन सुरू असता सुमित्रा शांतपणे उभी राहिली. निग्रहाने डोळ्यातील अश्रू परतावीत ती आलेल्या दोन एस्कॉर्ट सैनिकांच्या समवेत चालू लागली व राष्ट्रपतींच्या हस्ते पुरस्कार स्वीकारून परतली.

बारा वर्षाचा समीर आपल्या मामासोबत तोवर बसून होता. काय चालले आहे हे त्याच्या आकलनशक्तीच्या पलीकडचे होते. ती बँडची मंद धून, निवेदकाचा गंभीर आवाज, आपल्या नकळत डोळे पुसणारा मामा, गंभीर असलेली आई, आजूबाजूला असलेल्या लोकांचे चुकचुकणे याचा एक संमिश्र परिणाम त्याच्या कोवळ्या मनावर होत होता.

कार्यक्रम संपताच रणजितचा एकनिष्ठ सेवक ऑर्डरली रामशरण त्यांना शोधत आला.

“मेमसाब!” एवढेच तो सद्गदीत कंठाने बोलू शकला. त्याला बघून समीर लगेच त्याला बिलगला. एव्हढा सहा फूट उंच, दुहेरी हाडापेराचा तो राजपूत समीरच्या कृतीने अजूनच विरघळला. त्याने मायेने समीरच्या केसातून हात फिरवला आणि सहजगत्या दोन्ही हात धरून विचारले,” कैसे हो शेर?” पण लगेच सुमित्रेकडे वळून म्हणाला,” मेमसाब, बाबा को बुखार लगता है.” मामाने, जयने लगेच कपाळाला हात लावून बघितले व सुमित्रेला म्हणाला,” ताई, खरेच की, किंचित कोमट आहे.”

नंतर काही न बोलता रामशरणने समीरला उचलून घेतले आणि तिघेही त्वरेने पार्किंगकडे निघाले. गाडीत बसताच जयने सरळ गाडी त्यांच्या फॅमिली डॉक्टर राणे यांच्या दवाखान्याकडे नेली. ओळखीचे डॉक्टर असल्याने त्यांनी समीरला ताबडतोब तपासले.

“काही विशेष नाही. मी औषधे लिहून देतो. तीन दिवसात बरे वाटेल.”

“डॉक्टर, असा अचानक कसा ताप आला असेल?”

“अरे त्याच्या मनावर पण ताण आला असेलच की. आपण मोठी माणसे कोणाजवळ बोलून मन मोकळे करतात, तो बिचारा कोणाजवळ बोलणार? आईजवळ बोलावे तर ती पण दुःखात म्हणून त्याचा कोंडमारा झाला असावा.”

“खरे आहे डॉक्टर. त्याच्याकडे माझे जरा दुर्लक्षच झाले एवढ्यात.” सुमित्रा अपराधी भावनेने म्हणाली.

“एवढे काही वाईट वाटून घेऊ नकोस. अशा गोष्टी होतच असतात. जरा स्वतःची पण काळजी घे.”

ठीक आहे असे म्हणून ते घरी परतले. जयच्या पत्नीने, राधिकेने आल्याबरोबर उशीर का झाला हे विचारलेच पण समीरला ताप आहे म्हणताच सर्व सोडून त्याच्याच देखभालीत मग्न झाली.

“आता तू पण थोडा आराम कर.” जय सुमित्रेला म्हणाला.

सुमित्रा क्षणभर थबकली. आपल्या भावाकडे आणि वहिनीकडे अनिमिष नजरेने बघत राहिली. किती माया आहे यांची आपल्यावर आणि आपल्यापेक्षाही समीरवर कांकणभर जास्तच. ही दोघ नसती तर कसा हा प्रसंग आपण निभावला असता तिच्या मनात विचार चाटून गेला. जय आणि राधिका होतेच तसे प्रेमळ, मनमिळाऊ आणि एकमेकांना साजेसे, राजबिंडे, अनुरूप!

“मेमसाब,” रामशरण हळूच म्हणाला आणि तिची विचारशृंखला तुटली.

“काय रामशरण? घरचे कसे आहेत आणि सध्या तुझे पोस्टिंग कुठे आहे?”

“सब ठीक है मेमसाब आणि मी आता गावी शेती करतो.”

“पण तुझी पाच वर्षे बाकी होती ना?”

“थी मेमसाब, पर अब दिल नही लगता तो छोड दी.”तो शांतपणे म्हणाला.

न बोलताच तिला त्याचे कारण समजले.

संध्याकाळपर्यंत समीरचा ताप काही उतरला नाही औषधांचा कोर्स पूर्ण होईस्तो वाट बघावी असे जयचे मत पडले. पण रात्री समीर कण्हू लागला, ग्लानीत बडबडू लागल्यावर तो पण घाबरला. गोळ्या पण उलटीवाटे बाहेर पडल्या. या सर्व गडबडीने रामशरण जागा झाला व त्याने सुमित्रेला समीर काय म्हणतो आहे हे विचारले.

“काय म्हणतो ते काही कळत नाही. दोन तारे, ते बघा असे काहीतरी म्हणतो.” सुमित्रा म्हणाली. ते ऐकताच रामशरणचा चेहरा गंभीर झाला. थोडेसे उजाडताच होताच तो बाहेर गेला व तासाभरात परतला. त्याने आल्याबरोबर समीरकडे धाव घेतली. सुमित्रा तेथेच बसून होती.

“ताप उतरला?” त्याने विचारले.

“अजून तरी नाही.”

काही न बोलता त्याने खिश्यातून एक पुडी काढली व सुमित्रेला ती देत म्हणाला,

“हनुमानजीका अंगारा, अभी दो. बाकी बचा बेडके नीचे रखो.”

मोठ मोठे ऑफिसर्स पण जवानांच्या श्रद्धेला तडा जाईल असे वागत नाही हे सुमित्रेला माहिती असल्याने तिने निमूटपणे अंगारा घेतला. चिमूटभर समीरच्या जीभेवर ठेवला आणि पुडी उशीखाली ठेवली. हे सर्व निरखून बघणाऱ्या रामशरणकडे बघत म्हणाली,” हे पहा. झाले सर्व?”

“हा मेमसाब. अभी सब ठीक हो जायेगा देखो.” तो म्हणाला आणि खरेच अर्ध्या तासाने समीरने पाणी मागीतले. नंतर दोन तासातच त्याने क्षीणपणे सुमित्रेला हाक मारून खाण्यास मागितले. त्याला दरदरून घाम फुटला आणि ताप देखील उतरला.

हे सर्व अचंब्याने बघण्याऱ्या जयने एवढाच निष्कर्ष काढला की औषधांचा परिणाम झालेला दिसतो. तसे तो सुमित्रेला म्हणाला देखील त्यावर तिने औषधाने असो की श्रद्धेने समीरला बरे वाटले हे महत्वाचे असे म्हणून विषय संपवला.

रामशरण अर्थातच खुष होता. संध्याकाळीच त्याने गावी जायची गोष्ट काढताच सुमित्रेने त्याला दुसऱ्या दिवशी सकाळी जाण्याचे सुचविले. त्याने अर्थातच होकार दिला. निघतेवेळी तो सुमित्रेला म्हणाला,"मेमसाब मी येतो पण जसे जमेल तसे मी समीरला भेटायला आलो तर चालेल ना?"

"असे कसे विचारतो रामशरण. तो तर तुझा हक्कच आहे."

जय तेवढयात बाहेर आला व त्याने रामशरणच्या हातात बळेबळेच एक पाकीट कोंबले.

"साहब, इसका क्या जरुरी है? मी तर घरचाच माणूस आहे." रामशरण कसाबसा म्हणाला.

म्हणूनच घे असे सुमित्रा म्हणल्यावर त्याचा विरोध मावळला. परत एकदा झोपलेल्या समीरला थोपटून साश्रु नयनानेच त्याने सर्वांचा निरोप घेतला. जय त्याला सोडायला स्टेशनपर्यंत गेला.

जातेवेळी त्याला जय सहजच म्हणाला," रामशरण तुझ्या अंगाऱ्यांनी खरच कमाल केली."

"साबजी, कुदरत की बाते कुदरतही जाने." असे शांतपणे म्हणून त्याने निरोप घेतला.

----------*----------

# प्रकरण २

बरी-वाईट अशी कोणतीही घटना घडून गेल्यावर तिच्याशी रेंगाळण्यात काहीच अर्थ नसतो. तिचे परिणाम काय झाले, काय होतील यावर चर्वितचर्वण करणे म्हणजे निव्वळ कालापव्यय. यावर पूर्ण विश्वास असल्याने सुमित्रेने एका पब्लिक स्कूलमध्ये अध्यापन सुरु केले. सर्वांनी एकत्र रहायचे हे आधीच ठरल्याने समीरच्या संगोपनाचा प्रश्न उद्‌भवला नाही. तसेही मामीने त्याला दूर ठेवू दिलेच नसते. जयची नाशिकलाच एक मध्यम इंजिनिअरिंग कंपनी होती. फार मोठी नाही पण कॉन्ट्रक्ट, जॉबवर्क, सुटे पार्टस यांचा खात्रीचा पुरवठादार म्हणून लौकीक होता. दुर्दैवाने त्याला मुलबाळ व्हायची शक्यता नसल्याने त्याने सर्व लक्ष समीरवरच केंद्रीत करण्याचे ठरवीले. यामध्ये त्याच्या पत्नीची पूर्ण साथ होती एकंदरीत सर्व सुरळीत होत आहे असे वाटत असता अचानक हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने सुमित्रेचे निधन झाले. परिस्थिती माणसाला शहाणे करते असे म्हणतात ते खरेच आहे. आईचा मृत्युदेखील समीरने सहन केला तो मामा-मामीचे पाठबळ असल्याने. तसा लहानच असल्याने हा आघात देखील त्याने धीराने सहन केला. यामुळे त्याची आणि मामा-मामीची जवळीक अधिकच अकृत्रिम झाली ते दोघे देखील त्याला आई वडिलांची कमी जाणवू नये याकरीता प्रयत्नशील असायचे.

काळ हा सर्व गोष्टींवर रामबाण औषध आहे. कोणीही कोणाकरीता थांबत नाही मग काळतरी का थांबेल? तो त्याच्यागतिने धावतच असतो. समीरचेही

जीवन काळाबरोबर धावत होते. पितृक धाडसीपणा आणि मातृक व्यवहारीपणा यांचा एक सुरेख मिलाफ त्याच्या स्वभावात झाला होता. हे साधारणपणे आठवी-नववीपासून त्याच्या शिक्षकांच्या तसेच मामाच्या लक्षात आले होते. विशेष करून चाकोरी बाहेरचा विचार करणे ही एक त्याची खासीयत होती उदाहरणार्थ वर्गात एकदा शिक्षकांनी जॉर्ज वॉशिंग्टनची गोष्ट सांगितली. म्हणजे त्याच्या वडिलांनी त्याला एक

म्हणजे त्याच्या वडिलांनी त्याला एक कुऱ्हाड भेट दिली तर त्याने बगीच्यातील सर्व लहान-सहान झाडेच तोडली. ही झाडे कोणी तोड़ली असे वडिलांनी विचारले असता त्याने प्रामाणिकपणे मी तोड़ली असे सांगितले. यावर न रागावता त्यांनी त्याला बक्षीस दिले. ही सर्व गोष्ट गुरुजींनी रंगवून सांगितली व सर्वांना उद्देशून एक प्रश्न विचारला की जॉर्जच्या वडिलांनी त्याच्यावर रागावण्याऐवजी खुष होऊन बक्षीस का दिले? अभिप्रेत उत्तर तो खरे बोलला म्हणून दिले हे होते आणि मुलेपण वेगवेगळ्या प्रकारांनी तेच सांगत होते. पण समीरची पाळी जेव्हा आली तेव्हा तो म्हणाला की त्याचे वडील त्याला घाबरले असतील.

“असे का म्हणतोस?” गुरुजींनी कुतूहलाने विचारले.

“अहो सर, त्यावेळी पण त्याच्या हातात कुऱ्हाड होती म्हणून घाबरले असतील.”

यावर काय बोलावे हे गुरुजींना लवकर सुचले नाही. मोठ्या प्रयासाने त्यांनी समीरला कारणमिमांसा समजावली. त्यानेपण ते मान्य केले. तरीही शेवटी म्हणालाच की मी म्हणतो तसे घडले असेल ही शक्यता असू शकते. तक्रार

म्हणून नाही पण एक वेगळा प्रसंग म्हणून गुरुजींनी जयला ही गोष्ट सांगितली. त्याला वेगळा विचार करू द्यावा फक्त त्यात काही सुधारणा करायची गरज भासली तर जरूर करावी यावर दोघांचेही एकमत झाले.

या चाकोरीबाहेर विचार करण्याचा एक फायदा म्हणजे तो काय करेल हे सहसा कोणी सांगू शकत नसे. खेळात अभ्यासात आणि कामातपण त्याला या वेगळ्या दिशेने विचार करण्याचा नेहमीच फायदा होत असे. कोणत्याही प्रश्नाला एकापेक्षा जास्त उत्तरे असू शकतात आणि इतर वैध मार्ग कधी-कधी सोपे असू शकतात हे तर त्याच्या रक्तातच भिनले होते. नेहमीच त्याचे म्हणणे खरे होत असे नाही पण सक्सेस रेट चांगला होता

परीक्षेच्या वेळेस पण तो असाच विचार करत असे. इंजिनिअरिंगच्या तिसऱ्या वर्षी त्याला प्रयोगपरीक्षेच्या वेळी एक कठीण प्रयोग आला. सर्वच विद्यार्थ्यांनी तो नाकारल्याने मॅडमपण चिडल्या होत्या. त्यामुळे जेव्हा समीरला तो प्रयोग चिठ्ठीत आला तेव्हा त्यांनी आधीच जाहीर केले की प्रयोग बदलून मिळणार नाही. यावर इतर विद्यार्थ्यांप्रमाणे वाद न घालता समीरने शांतपणे त्याला परीक्षाच द्यायची नाही असे सांगितले.

"तुझे वर्ष वाया जाईल." मॅडम म्हणाल्या.

"जाऊ देत मॅडम. प्रयोग जमला नाही तर तसेही वायाच जाईल." समीर नम्रपणे म्हणाला.

"पण प्रयत्न तर कर. आधीच काय हातपाय गाळतोस?"

"अहो, वर्षभरात कोणालाही जमले नाही ते मी तीन तासात कसे काय करणार? त्यापेक्षा जाऊ दे. मी तुम्हालाही दोष देत नाही. माझाच रोल नंबर

शेवटी असल्याने सोपे प्रयोग आधीच संपले त्याला तुम्हीतरी काय करणार?" असे म्हणत तो फार दुःख झाल्यासारखे दाखवत जड पावलांनी बॅग उचलून चालू लागला. मनातल्या मनात मात्र केंव्हा मॅडम परत बोलावतात याची वाट बघत होता.

झाले. अपेक्षेप्रमाणे मॅडम विरघळल्या आणि त्याला आवाज देवून म्हणाल्या," अरे, असे कसे? तू सुरु तर कर मी तुला मदत करते."

दोन तासातच प्रयोग यशस्वी झाला. म्हणजे मॅडमनी केला. प्रश्नोत्तरे पण छान झाली. तशी ती होणारच होती. कारण प्रश्न विचारण्याऱ्या मॅडमच होत्या. पदवी मिळाल्यावर मामाच्या धंद्यात मदत करायची हे समीरने आधीच ठरवले होते. फक्त जयची एक अट होती की त्याने आधी शॉपमधे काम करावे आणि अनुभव घ्यावा, नंतर व्यवस्थापन. हे समीरलापण मान्य होते.

त्याप्रमाणे ट्रेनी म्हणून रुजू झाल्यावर त्याला खरा फरक समजला. कॉलेजमधील पुस्तकी ज्ञान आणि प्रत्यक्षातील व्यवहारी ज्ञान यातील फरक बघून तो स्तिमित झाला. याशिवाय परस्पर संबंध, व्यवस्थापकीय कौशल्य हे कोणत्याही पुस्तकात नसते आणि त्याचा वापर करणे हे प्रत्येकाला आपले स्वतःच ठरवावे लागते हे पण त्याच्या लक्षात आले. साधारणपणे मामा-भाच्याची फार गट्टी असते तशी जय आणि समीरची पण होती. आपल्या चिमुकल्या विश्वातल्या त्याच्या दृष्टीने मोठ्या असलेल्या घडामोडी समीर जयला विश्वासाने सांगत असे. जय पण त्या रस घेऊन ऐकत असे. त्याप्रमाणे याही घटनांचा जय मूक साक्षीदार होताच पण तरीदेखील जयला सतत वाटत असे की वेगळा विचार करण्याच्या सवयीचा प्रत्यक्ष काम करतेवेळी जास्त

उपयोग होईल. जेंव्हा समीर जयला कामात मदत करायला लागला तेव्हा त्याला याची प्रचिती आली.

सर्व प्रकारचा अनुभव यावा म्हणून समीरने शॉपफ्लोअरपासून सुरवात करावी असे जयने समीरला सुचविले होते. समीरची त्याला काहीच हरकत नव्हती म्हणून त्याने मशीन शॉपमध्ये काम करायला सुरवात केली. आठ-दहा दिवसातच त्याच्या लक्षात आले की काम सांगणे सोपे पण करून घेणे महाकठीण! जय उद्यम ही जयची कंपनी, तशी पंधरा वर्षे जुनी होती त्यामुळे कंपनीतपण नवे-जुने, कुशल-अकुशल असे मिळून जवळपास पाचशे कर्मचारी होते. त्यांना आवश्यक असणारे एच आर, अकाऊंट, सुरक्षा हे विभागपण होतेच. युनियन तर होतीच फक्त ती अंर्तगत असल्याने फारश्या कटकटी नव्हत्या एवढेच. समीर ज्या विभागात काम करू लागला तो अंतीम जुळणी विभाग होता. पूर्ण झालेले प्रॉडक्ट तेथून डिस्पॅचला पाठवीत असत. या कामाकरिता अर्थात लॉजीस्टीक विभाग होता. ते विशेष प्रशिक्षीत ड्रायव्हरकरवी हे काम करीत असत. हे काम तसे जबाबदारीचे होते कारण प्रॉडक्ट जर ने-आण करतेवेळी डॅमेज झाले तर सर्व मेहनत पाण्यात जात असे. याची जाणीव असल्याने ड्रायव्हरचे प्रस्थ फारच वाढले होते. सर्व नाही पण एक ड्रायव्हर, रघु ठोंबरे हा तर फारच उद्दाम झाला होता. एकतर जुना होता, कुशल तर होताच पण आपल्यामुळे काम अडू शकते याची जाणीव झाल्याने दुरुत्तरे करणे, न सांगता गैरहजर राहणे वगैरे प्रकार करित असे. त्याला काम सांगणारे पण तुलनेने नवीन असल्याने तो त्यांना सहज टोलवीत असे. कधी गाडीचा प्रॉब्लेम सांग, तर कधी ऐनवेळी दवाखान्यात जाणे असे प्रकार करीत असे. सुपरवायझर पण त्याच्या

फंदात फारसे पडत नसत. समीर हे सर्व बारकाईने बघत होता. एक दिवस समीरने काम सांगतांना रघुला पण दिवसभराचे काम दिले. तो तेव्हा तर काहीच बोलला नाही पण थोड्या वेळाने समीरला भेटून त्याने सांगितले की तो काम करू शकत नाही. साहजिकच समीरने कारण विचारले. त्याबरोबर त्याने बोटाला लागले आहे असे सांगितले आणि उजवा हात दाखवला. त्याच्या मधल्या बोटाला खरेच छोटेसे बँडेज होते, पण काम करता येणार नाही एवढेही काही नव्हते. समीरने शांतपणे काय लागले, केव्हा लागले वगैरे विचारले आणि लाईट ड्यूटीकरिता डॉक्टरची नोट आण म्हणून सांगितले. ती नोट डॉक्टर देणार नाही याची समीरला खात्री होती.

"डॉक्टर नोट देत नाही." रघु उत्तरला.

"मग काम सुरु कर." समीर म्हणाला.

"काम करताना जर कळ आली तर अपघात होऊ शकतो." रघुचा युक्तिवाद.

बॅरिस्टर व्हायचा, चुकून ड्रायव्हर झाला समीर मनात म्हणाला पण उघडपणे काम तर करावेच लागेल इतकेच म्हणाला. एव्हाना काय होत आहे हे बघायला दोघे-तिघे थबकले त्यामुळे रघुला जास्तच चेव आला. रघु म्हणाला करून करून हा कालचा पोरगा काय करणार असे त्याला वाटले. फारतर हा एच आरला कळवेल, मामुली चौकशी होईल. नेहमीप्रमाणे जाऊ द्या, जाऊ द्या होईल. फारच झाले तर युनियन लीडर मधे पडतील. आपल्याला तोंडदेखले रागावतील आणि परत ये रे माझ्या मागल्या होईल. हा रघुचा आडाखा आणि आजवरचा अनुभव होता.

"हे तुझे शेवटचे उत्तर?"

“होय, काय करायचे ते करा.”

“ठीक आहे. आत्तापासून तू कोणतेही काम करायचे नाही. सेक्शनच्या गेटपाशी खुर्चीत निवांत बसून रहायचे. पण कोणाशीही बोलायला जायचे नाही.”

रघु चमकला. त्याचा आपल्या कानावर विश्वासच बसेना. आंधळा मागतो एक डोळा तर देव देतो दोन असे त्याला वाटले.

“फक्त जेवणासाठी तू कँटिनला जाऊ शकतोस इतर कोणत्याही वेळी खुर्ची सोडायची नाही.” समीरने विस्ताराने सांगितले. तेवढ्यात बाजूने जाणाऱ्या सेक्युरिटीला थांबवून समीरने त्यालापण या सर्व सूचना दिल्या. आणि रघुच्या शिक्षेची कल्पना दिली. रघु खुर्ची सोडून जाणार नाही तसेच कोणाशीही बोलणार नाही याकडे लक्ष देण्यास सांगितले. तसेच तो कोणाशीही बोलतांना आढळला तर तुम्हालाच चार्जशीट मिळेल हे बजाविण्यास पण तो विसरला नाही.

“ही शिक्षा कुठपर्यंत?” आनंदाच्या उर्मी दाबत रघुने विचारले.

“जोपर्यंत तू स्वतःहून काम मागत नाही किंवा मी सांगत नाही तोपर्यंत.” समीर म्हणाला. ऐकण्याऱ्या सर्वांना ही कसली शिक्षा उलट हे तर बक्षीसच आहे असेच वाटले. ज्याला जी भाषा समजते त्या भाषेतच उत्तर द्यायला हवे असे सर्वांचे मत पडले. फक्त समीर आपल्या निर्णयावर ठाम होता. थोड्यावेळाने जय आल्यावर समीरने त्यालापण काय झाले ते सांगितले. रघु दुरुन बघतच होता. आता जय समीरला रागवेल असे त्याला वाटले पण जय आपल्या भाच्याला ओळखून होता त्यामुळे त्याने समीरच्या निर्णयात काहीही फेरबदल केला नाही. उलट त्यालाही काय होईल याबद्दल जरा कुतूहलच होते.

रघुचा तो दिवस तर फार आनंदात गेला. काही न करता नुसते बसून रहायचे ही सवलत तर घरीपण मिळत नाही असे त्याला वाटले. पण दुसऱ्या दिवसापासून त्याला यातील त्रास जाणवू लागला. नुसते बसणे ठीक होते पण कोणाशीही न बोलणे महाकठीण. त्यातून टॉयलेटला जरी जावे तर मागे सेक्युरिटी आहेच. एकदोन दिवस जेवतांना लोक बोलले पण नंतर टोमणे सुरु झाले. जेवणानंतर कोणाशी बोलावे तर जो तो झटकायला लागला. तुला काय लेका नुसते बसायचेच आहे पण आम्हाला काम आहे असे चहा-नाष्टेवाला पण म्हणू लागला. हे त्याला जरा जास्तच जिव्हारी लागले. आपल्यावाचून काही काम अडत आहे असेही त्याला दिसेना. समीरने सरळ पर्यायी ड्रायव्हर भरती केला होता. त्यानेपण एक-दोन दिवसातच काम शिकून घेतले व नेहमीपेक्षा जास्त काम व्हायला लागले. तेपण कटकटीशिवाय, हे जास्त महत्वाचे होते. त्यामुळे सुपरवायझर्स पण खुश होते.

युनियन लीडरकडे तक्रार करावी तर काय सांगायचे हा प्रश्न होता. लोक काम जास्त म्हणून ओरडतात तर तू लेका काम नाही म्हणून ओरडतो अशीच संभावना व्हायची शक्यता जास्त होती. आपल्याला येडा केला हे रघुच्या चार

दिवसातच लक्षात आले. आणखी दोन दिवस त्याने कसेबसे काढले. शेवटी कंटाळून आणि वैतागून रघु सहाव्या दिवशी समीरकडे गेला व स्वतःहून म्हणाला,”साहेब, माझे चुकले. मला काम द्या.”

----------*----------

# प्रकरण ३

झालेल्या घटनेने जयला समीरविषयी जरा वेगळाच विश्वास वाटू लागला. आपला भाचा नुसताच पुस्तकी पंडित नाही याचा त्याला अभिमान वाटला. त्यामुळे त्यानी हळूहळू समीरच्या जबाबदाऱ्या वाढवणे सुरू केले. ते ऐंशीचे दशक होते. आय. टी. चा नुकताच उदय झाला होता. मोबाईल तंत्रज्ञानाची चाहूल लागली होती. समीरला हा बदल जाणवत होता. त्याने जयशी चर्चा करून संदेशवहनाच्या बाबतीत आपण काय करू शकतो याचा अंदाज घेणे सुरु केले होते. एकंदरीत आवाका बघता हे आव्हान सरकारी क्षेत्रातील कंपन्या पेलू शकतील असे वाटत नव्हते. सरकारला याची जाणीव होती पण तंत्रज्ञानाचा विस्फोट किती होईल, त्याचा जनसामान्यावर कितपत प्रभाव पडेल, हे कसे स्वीकारतील याबद्दल सर्वजण संभ्रमात होते. बराच विचार केल्यावर आपण सुटे पार्टस आणि असेंब्ली यावर जास्त लक्ष केंद्रीत करायला पाहीजे हे त्यांनी ठरवले. त्यामुळे त्यांच्या उत्पादनात विविधता राहील तसेच मार्केटमधील तेजी-मंदीचा परिणाम जाणवणार नाही असा त्यांचा कयास होता. एक दिवस ऑफीसमधे ते हीच चर्चा करत बसले होते. असेम्बली बद्दल विशेष अडचण नाही पण स्पेअर पार्टस करीता काही मशिनरी घ्यावी लागेल असे समीरचे मत होते तेवढ्यात फोन वाजला. (होय, तेव्हा फोनच वाजायचे). समीरने फोन उचलला.

“हॅलो, जय उद्यम?” पलीकडून अतिशय नम्रतेने विचारणा झाली.

“होय. आपण?” समीरने विचारले.

“मी मंदार गोखले. मला जय सरांना भेटता येईल काय?”

समीरने जयला फोन दिला. जयने फोन घेतांना भुवया उंचावून कोण असे समीरला विचारले. समीरने खुणेनेच माहिती नाही असे सांगितले.

“सर, आपण या आधी भेटलो नाही पण मला तुम्हाला पंधरा मिनिटे भेटता येईल काय?” परत विचारणा झाली.

“भेटायला काहीच हरकत नाही पण कसल्या संदर्भात हे कळू शकेल काय?” जयने विचारले.

“फोनवर सांगणे जरा कठीण आहे. आपण प्रत्यक्ष भेटीतच बोलू.”

“ठीक आहे. केव्हा येता?”

“दहा मिनिटात.” आणि फोन कट झाला. बरोबर दहा मिनिटांनी एक उंचापुरा गोरापान, कुरळ्या केसाचा तीशीतील तरुण आला. त्याचा मूळचा गोरा वर्ण उन्हामुळे रापला होता. त्याने एकंदरीत फारच कष्ट उपसले असावे हे जाणवत होते. केबिनचे दार उघडेच होते. त्याला बघताच जयने आतूनच त्याला येण्याची खूण केली आणि तो आत आल्यावर बसण्यास सांगितले. त्याने खिशातून रुमाल काढला. कपाळावरील घाम पुसतच तो खुर्चीत बसला. तेवढ्यात समीरने त्याच्यापुढे पाण्याचा ग्लास सरकवला. थँक्स म्हणत त्यनी ग्लास रिकामा केला. जयने तो जरा स्थिरावल्यावर त्याची आणि समीरची ओळख करून दिली.

“मी मंदार गोखले. मघाशी आपण फोनवर बोललो आहे.” असे म्हणत त्याने खिशातून आपले व्हीजीटींग कार्ड काढले आणि अदबीने उभे रहात त्यानी

दोन्ही हातात ते धरले व जयपुढे केले. जयने पण तितक्याच अदबीने उभे रहात ते स्वीकारले. याच पद्धतीने त्याने समीरलापण दुसरे कार्ड दिले. व्हिजीटिंग कार्ड दयायची ही पद्धत समीरने फक्त ऐकली किंवा वाचली होती प्रत्यक्ष कोणी वापरतांना प्रथमच बघत होता.

'गोकार्ट इंजिनीअरिंग' जय कार्ड वाचत म्हणाला."हे नाव कुठेतरी ऐकल्यासारखे वाटते."

आणि काय काम आहे हे विचारले.

"तुम्हाला काही मशिनरी पाहिजे आहे असे मला कळले." तो म्हणाला.

"पाहिजे हे खरे आहे पण आमचा विचार अजून निश्चित झाला नाही. शिवाय कोणालाही आम्ही अजून बोललो नाही. तुला कसे कळले?"

"अहो सर पुण्याचे मार्केट म्हणजे एवढे काही मोठे मार्केट नाही. तुम्ही सहज कुठे चौकशी केली तरी सगळीकडे बातमी होऊ शकते."

"खरे आहे." जय म्हणाला," पण तुमच्याकडे कोणती मशिनरी आहे आणि तुम्ही का विकत आहात?"

"मशिनरीची यादी या फाईलमधे आहे आणि तुमचे सर्व प्रॉडक्ट तुम्हाला यातून करता येतील. काही मल्टीपर्पझ आहेत तर काहीत थोडा फेरफार करावा लागेल." तो फाईल जयला देत म्हणाला.

"तुम्ही अजून मशिनरी का विकत आहात हे नाही सांगितले?" समीरने विचारले.

मंदारच्या चेहऱ्यावर एक उदासीची छाया येऊन गेली असे समीर आणि जयला दोघांनाही जाणवले.

“काही नाही. मी बिझनेस बंद करतोय.” तो स्वतःला सावरत म्हणाला. यावर काय बोलावे हे जय आणि समीरला कळेना त्यामुळे केबिनमध्ये थोडावेळ शांतता पसारली. फक्त एसीचा आवाज ऐकू येत होता.

प्रथम बोलला तो जय,” तुमची काही हरकत नसली तर मी कारण विचारू शकतो?”

“जरूर. त्यात लपवण्यासारखे किंवा वाईट वाटण्यासारखे काहीच नाही. तुम्ही मघाशी कार्ड वाचतांना गोकार्ट हे नाव कुठेतरी ऐकल्यासारखे वाटते असे म्हणाला होता. ते गोकार्ट माझेच प्रॉडक्ट. सायकलला मागच्या चाकाला हे गोकार्ट जोडायचे आणि एक लिटर पेट्रोलवर ऐंशी किलोमीटर सायकल पळवायची अशी मूळ कल्पना होती.”

“होय. तशी जाहिरात वाचल्याचे मला आठवते आणि तुम्हाला प्रतिसाद पण चांगला मिळाला अश्या बातम्या होत्या.”

मंदारने डोळे त्या आठवणीने चकाकले.

“हो खरे आहे ते. पहिल्या आठवड्यातच माझे वर्षभराचे बुकिंग फुल झाले, तेही फक्त पुण्यात!”

“मग?” समीरने विचारले. तेवढ्यात चहा आला. सर्वांसमोर चहा ठेवून चहावाला जाईपर्यंत मंदार काहीच बोलला नाही. तो जाताच चहाचा एक घोट घेत मंदार पुढे म्हणाला,” मग काय, जोरात प्रॉडक्शन करून ठरलेल्या दिवशी

थाटात डिलिव्हरी द्यायला सुरु केली पण दुसऱ्या दिवसापासूनच ग्राहकांच्या तक्रारी सुरु झाल्या."

"कुठे माशी शिंकली? गोकार्टमध्ये काही प्रॉब्लेम होता काय?" जयने खुर्चीत मागे रेलत विचारले.

"नाही हो. गोकार्ट एकदम ओके होते. नाही अजूनही आहेच. पण मी कल्पनाही केली नव्हती अश्या विचित्र कारणामुळे ग्राहक गोकार्ट परत करू लागले."

"कशामुळे? समीरने विचारले.

"कुत्र्यांमुळे!" मंदार शांतपणे म्हणाला.

"काय? कुत्र्यांमुळे?" जय आणि समीर एकदमच ओरडले.

"होय कुत्र्यांमुळे. कुत्री स्कूटर, मोटरसायकलच्या मागे भुंकत पळतात हे तुम्हाला ठाऊक असेलच तसेच ती या गोकार्टच्या मागे भुंकत पळायची. तुलनेनी गोकार्टचा वेग कमी असल्याने चालवणारा तोल जाऊन पडायचा. ग्राहकांची मर्जी जाण्यास एवढे कारण पुरेसे होते. मी काही त्यांना दोष देत नाही. प्रॉडक्ट गुप्त ठेवण्याच्या नादात मी रस्त्यावर टेस्टिंग केले नाही. फक्त कंपनीतच केले. ही माझी चुक मला भोवली. पुण्यात जर एखादे प्रॉडक्ट चालले नाही तर काय होते तुम्हाला माहित आहेच."

यावर काय बोलावे हे जय आणि समीरला काही सुचले नाही. तिघांनीही न बोलता चहा संपवला. चहा संपताच मंदार म्हणाला,"अरे मी पण काय माझीच रडकथा सांगत बसलो. बँकेचे हप्ते देऊ न शकल्याने सहा महिन्यानंतर त्यांनी

नोटीस पाठविली. ते तरी काय करणार म्हणा. तुम्ही या मशिनरी बघायला. केव्हा येणार की मी फोन करू?”

जय, अगदी शांत सुरात म्हणाला,” असे आहे मंदार की आम्हाला मशिनरी जरूर पाहिजे पण….”

त्याचे बोलणे अर्ध्यातच तोडत मंदार म्हणाला,” कळले. काही वाईट वाटून घेऊ नका. मी हा काही पहिलाच नकार ऐकत नाही. पण तुम्ही माझे म्हणणे शांतपणे ऐकून घेतले वर चहापण पाजला याबद्दल आभार. तुमचा विचार बदललाच तर मला जरूर कळवा.”

असे म्हणत तो फाईल घेऊन जायला उठला. त्याला हातानीच थांबण्याची खूण करत जय,” आम्हाला मशिनरी पाहिजे आहे पण तुझ्यासकट.”

आता चकीत व्हायची पाळी मंदारची होती.

“मी नाही समजलो.” तो म्हणाला.

“म्हणजे असे की तुझी जर हरकत नसेल तर आम्ही तुला पंचवीस टक्के भागीदारीची ऑफर देत आहोत. तुझी मशिनरी हीच तुझी इन्हेस्टमेंट, कायदेशीर बाबी आमची लीगल टीम पूर्ण करेल. विचार करून सांग.”

“त्यात काय विचार करायचा. पण एक शंका आहे.”

“काय?”

“आपण तिघे भागीदार आहोत तर भागीदारी 33. 33 टक्के होईल. ती पंचवीस टक्के का?”

यावर जय खदखदून हसला व म्हणाला,” कारण चौथा भागीदार कम हुकूमशहा माझी पत्नी आहे.”

“मग काय बोलणेच खुंटले. मी तयार आहे.” मंदारने दोघांशीही हात मिळवले.

“अजून एक गोष्ट,” जय म्हणाला,” शनिवारी संध्याकाळी आमच्याकडे जेवायला ये म्हणजे तिचीपण ओळख होईल आणि सविस्तर बोलता येईल. हा माझा पत्ता. जरा दूर आहे.

“असू दे, जेवणाकरता मी कितीही दूर जायला तयार असतो. पण मला फक्त एकच सांगा.”

“आता काय?” जयने विचारले.

“तुमच्याकडे कुत्रा आहे काय?”

----------*----------

# प्रकरण ४

ठरल्याप्रमाणे मंदार रविवारी जेवायला आला आणि घरचाच होऊन गेला. महिन्याभरात त्याची कंपनीपण जय उद्यममधे विलीन झाली. मंदारने त्याचे काही एकनिष्ठ कामगार पण बरोबर आणले. त्यानंतर जय उद्यमची खरी भरभराट सुरु झाली. कारसाठी एक छोटे ए. सी. युनिट समीरने बनविले जे फारच यशस्वी ठरले. संदेशवहन आणि त्यासाठीचे सुटे भाग याचे उत्पादन जोरात सुरू झाले. खरे कारण होते सरकारचे बदलते धोरण. पेजरवर अडकलेले भारतीय हळूहळू मोबाईल कधी वापरू लागले हे त्यांना पण कळले नाही. अर्थात सुरवात अडखळती होती कारण मार्केट किती अफाट आहे याचा अंदाज कोणालाच येत नव्हता. सरकारी धोरणाचा एक भाग म्हणून आपल्या शेजारी देशांना निर्यात करायला सरकार उत्तेजन देत होते. त्यानुसार श्रीलंका, म्यानमार, बंगलादेश या देशात काही प्रमाणात निर्यात सुरू करण्यात आली होती. जय उद्यम अर्थात प्रमुख निर्यातदार झाला. त्याकरिता काही शिष्टमंडळे अधूनमधून या देशात जात असत. तेथील समस्या, गरजा याचा अभ्यास करणे त्याप्रमाणे आपले निर्यात धोरण आखणे हा त्यामागील प्रमुख उद्देश असे. त्यामुळे जय बरेचदा शेजारील देशात जात येत असे. समीर मात्र कोठेही जाण्यास निरुत्साही असे किंवा शक्यतो जाणे टाळतच असे म्हणले तरी योग्य होईल.

अशाच एका दिवशी मिटींगमधे जयने जाहीर केले की पुढील महिन्यात एक शिष्टमंडळ बंगलादेशला जाणार आहे त्यात आपल्याला एक प्रतिनिधी

पाठवायचा आहे तरी समीर किंवा मंदार यांनी आपसात ठरवून त्याप्रमाणे सांगावे.

“मला यावेळीस जायला जमणार नाही.” मंदारने जाहीर केले.

“का?” जयने विचारले

“कारण सोनम ड्यू आहे. डॉक्टरांनी पुढच्या महिन्यातील तारीख दिली आहे.”

“मग समीर जाईल.”जय म्हणाला.

“नाही, नाही.” समीर म्हणाला.

“नाही नाही काय? दुसरे कोण जाणार मग?” जय काहीसा चिडून म्हणाला.

“ते तू बघ. पण मी जाणार नाही.”

“विचार करून सांग.”

“विचार करूनच सांगतोय.”

मामाला भाच्याचे सर्व हातखंडे परिचित होते त्यामुळे जय काही जास्त बोलला नाही.

विषय संपला असे समीरला वाटले पण तसे व्हायचे नव्हते परत दोन-तीन दिवसांनी रात्री जेवतेवेळी जयने हा विषय परत काढलाच.

“समीर, तुला पुढच्या महिन्यात जावे लागणार.”

“कोठे?”समीरन वेड पांघरून विचारले.

“बंगलादेशला.” जय शांतपणे म्हणाला.

“मामी!”समीरने मदतीच्या अपेक्षेने नाटकीपणाने ओरडला. पण यावेळेस जयने पूर्ण तयारी केली होती कारण राधिकाने ढुंकूनही बघितले नाही.

“समजलो. मी पोरका म्हणून तुम्ही मला अशी वागणूक देत आहा.”

“अनाथ शब्द राहिला.” जयने आठवण करून दिली. एकंदरीत काही डाळ शिजणार नाही हे

ओळखून समीर गप्प बसता

दुसऱ्या दिवशी कामावरून परतल्यावर त्याला व्हरांड्यातच शिवा भेटला. शिवा हा रामशरणचा मुलगा. हा पण रामशरण बरोबर समीरला भेटायला येत असे. समीरपेक्षा चार वर्षांनीं मोठा होता. दोघांमधे अकृत्रिम स्नेह होता. त्याला बघताच समीरला आनंद झाला.

“अरे शिवा. बऱ्याच दिवसांनी आला.”

“हो. जरूरी काम आहे.” शिवा गंभीरपणे म्हणाला.

“अरे हो हो. एवढे काय जरूरी काम आहे. जरा आल्यासारखा रहा मग बघू.”

“नाही समीर आपल्यापाशी वेळ फार कमी आहे. तुला माझ्याबरोबर ताबडतोब माधोपूरला यावे लागणार आहे.”

“एवढे काय जरूरी काम आहे?”

तेवढ्यात राधिका बाहेर आली आणि म्हणाली,”अरे समीर जरा बघ आल्यापासून काही सांगत नाही. सारखा तुझ्याच नावाचा धोशा सुरू आहे.”

“बाबूजी सक्त बिमार आहे. सारखे समीरला घेऊन ये एवढेच म्हणत आहे. फोनपण लागेना म्हणून मीच आलो.” शिवा कसाबसा बोलला.

रात्रीच्या फ्लाईटने दोघेही जयपुरला पोचले. तेथून समीरने सरळ टॅक्सी केली आणि सकाळी अकराच्या दरम्यान दोघेही माधोपूरला पोचले. संपूर्ण प्रवासात शिवा काहीही बोलण्याच्या मनस्थितीत नव्हता आणि ते साहजिक होते. उशीर तर होणार नाही एवढाच विचार त्याच्य मनात घोळत होता त्यामुळे समीरने जास्त चौकशी केली नाही. दोघेही घरापाशी पोचताच घराभोवती असलेला पन्नास-साठ लोकांचा जमाव जणू दुभंगला. समीर आणि शिवा थेट रामशरण असलेल्या खोलीत गेले. त्या दोघांना बघताच उशाशी बसलेला डॉक्टर पटकन उठला. त्याने समीरला त्याच्या जागी बसण्याची खूण केली व तो शिवाला घेवून बाहेर गेला. जाता जाता तो समीरला खांद्यावर थोपटून ‘समय बहुत कम है ’ एवढेच पुटपुटला. रुग्णशैयेवर पहुडलेल्या रामशरणला बघून समीरला भडभडून आले. लहानपणापासून त्याने केलेले लाड क्षणार्धात डोळयासमोरून सरकले. एवढा धिप्पाड आणि हट्टाकट्टा रामशरण पार खंगला होता. समीर त्याच्या उशाशी बसला आणि त्याच्या चेहऱ्याजवळ आपला चेहरा नेत म्हणाला,” चाचा, मैं समीर आया हूँ.”

हे वाक्य ऐकताच त्या किंचीत धुगधुगी असलेल्या रामशरणच्या शरीरात थोड़े चैतन्य आले.

“समीर बेटा.” असे म्हणताच त्याच्या डोळयातून अश्रु ओघळले. थरथरत्या हाताने त्याने कसेबसे समोरच्या कोनाड्याकडे बोट दाखवले. कोनाड्यात एक लाकडी पेटी होती. साधारण कंपासपेटीपेक्षा थोडीशी मोठी

असेल. समीरने ती हलकेच उचलली आणि रामशरणसमोर धरली. त्याने खुणेनीच ती उघड असे सुचवले. ती उघडताच आत एक चंद्रतारा असलेली कापडी हिरवी फीत दिसली. ती हिसका देऊन तोडलेली दिसत होती. ती समीरने बाहेर काढली. त्याखाली एक जुना पिवळसर फोटो होता. तोही समीरने काढला व रामशरणसमोर धरला.

“अशफाक.” रामशरण क्षीण स्वरात म्हणाला.

“कोण अशफाक आणि त्याचे काय?” समीर अधीरपणे म्हणाला.

मोठया कष्टाने रामशरणने मेघना हॉस्पिटलच्या परिसरात ११ डिसेंबर १९७१ ला काय घडले ते अडखळत सांगितले.

थरथररत्या हाताने फोटो धरत रामशरण म्हणाला,” सकिना अशफाक कोठे आहे ते सांगेल.”

“कोण सकिना, ती कुठे भेटेल?”

तोच रामशरणच्या हातून फोटो खाली जमिनीवर पडला आणि त्याचा निष्प्राण हात खाली आला.

निराशेनी समीरने ती फीत खिशात ठेवली आणि खाली पडलेला फोटो उचलण्याकरिता खाली वाकला. फोटो खाली उपड़ा पडला होता आणि त्याच्या मागे लिहिले होते 'सकिना मेघना हॉस्पीटल. दसवा मील १९७१-ढाका. तो फोटो एका परिचारिकेच्या वेषातील तीशीच्या तरुणीचा होता.

क्षणभर त्याने तो फोटो निरखून पाहिला, त्याला काही बोध होईना. लगेच भानावर येऊन त्याने फोटो खिशात ठेवला व शिवाला हाक मारली. दोघेही धावत आले डॉक्टरने लगबगीने रामशरणला तपासले आणि निराशेने मान

हलवली. तेंव्हा शिवा जोराने आक्रोश करीत रामशरणच्या निष्प्राण देहावर कोसळला. समीरने कसेबसे त्याला सावरले. नंतरचे सर्व सोपस्कार आणि विधी समीरने करवून घेतले असे म्हटले तरी चालेल.

समीरने जय आणि राधिकाला काय झाले ते कळवले. त्यांनी सर्व विधी आणि दिवस पूर्ण होईपर्यंत तेथेच राहण्याचे सुचवले. त्याप्रमाणे संपूर्ण चौदा दिवस होईपर्यंत समीर तेथेच राहिला. या साध्या कृतिने त्याने रामशरणच्या कुटुंबीयांची व गावकऱ्यांची मने जिंकून घेतली.

दोन-तीन दिवसांनी दुःखाचा पहिला कढ ओसरल्यावर जरा निवांत वेळ बघून समीरने शेवटच्या क्षणी रामशरण व त्याच्यात जो काही तुटक संवाद झाला होता तो शिवाच्या कानी घातला. ती फीत आणि फोटो दाखवून यावरून काही बोध होतो का हे विचारले. पण तो पूर्णपणे अनभिज्ञ होता. हे सुतकाचे चौदा दिवस म्हणजे तसे पाहिले असता अतिशय कंटाळवाणे असतात. जे काही धार्मिक विधी असतात ते सकाळी बारा वाजायच्या आत संपल्यावर नंतर दिवसभर सांत्वनाकरिता येणाऱ्या लोकांना भेटणे एवढे एकच काम असते. तसा समीर प्रत्यक्ष संबंधीत नसला तरी शेवटच्या क्षणांचा साक्षीदार असल्याने लोक त्याच्याशीही बोलत असत आणि अप्रत्यक्षरित्या त्याचे पण सांत्वन करित असत. या सर्व वेळात समीरला एकच ध्यास सतत लागला होता की अशफाक सकिना, मेघना हॉस्पीटल, दसवा मील आणि ढाका यांचा एकमेकांशी काय संबंध असावा.

बराच विचार केल्यानंतर तो या विचाराप्रत येऊन पोचला की ही जी कोण सकिना आहे ती जिवंत असल्यास तिला भेटल्याशिवाय काही या कोड्याचा

उलगडा होऊ शकत नाही आणि तिला भेटायचे असल्यास ढाक्क्याला जाणे जरुरी आहे. अर्थात तिला शोधणे हे काही सोपे नव्हते कारण त्यावेळी ढाक्क्याची लोकसंख्या होती जवळपास पंधरा लाख! हा सर्व विचार करून चौदावा दिवस सरताच त्याने शिवाचा निरोप घेतला. दुःखात पूर्णपणे साथ दिल्याने शिवापण भारावून गेला होता. त्याने भरल्या अंतःकरणाने निरोप दिला. शिवा नको म्हणत असताही दहा हजाराचा चेक समीरने बळेबळेच शिवाच्या हातात दिला. संबंध आहे तसेच ठेवायचे असे वारंवार बजावून समीर दुसऱ्या दिवशी जयसमोर उभा राहून म्हणाला की मी बंगलादेशला जायला तयार आहे केंव्हा निघू?

जयने हातातली फाईल बाजूला ठेवून किंचित आश्चर्याने समीरकडे निरखून बघितले. माधोपूरहुन परतल्यापासून समीर जरा गंभीर झाला आहे, पहिल्यासारखा हसतखेळत नाही हे त्याला जाणवले होते पण ही बंगलादेशी जाण्याची तयारी काहीशी विसंगत होती. तरी त्याने हसून विचारले," काय रे, अचानक का विचारतो?"

"नाही तू म्हणत होता ना म्हणून विचारले."

"त्याला झाला की आता महिना. शशी जाऊन आला पण."

"तेवढाच बदल झाला असता म्हणून विचारले. त्या सुतकी वातावरणामुळे कंटाळलो बाबा."

तेवढ्यात फोन वाजला. जयने उचलला आणि नेहमीचे हाय हॅलो होताच विचारले," बापटसाहेब, हवा कशी आहे हे विचारण्यासाठी तुम्ही नक्कीच फोन केला नाही. निःसंकोचपणे काय काम आहे ते सांगा."

पलीकडून बापटसाहेबांचा हसण्याचा पुसटता आवाज समीरच्या कानी पडला. असेल मामाचा कोणी मित्र किंवा कस्टमर असा विचार करून तो उठू लागणार तोच जयने खुणेने त्याला बसण्यास सांगितले.

“हो, बघतो जरा कठीण वाटते पण तुम्हाला होकार, नकार काय असेल तो अर्ध्या तासात कळवतो.” असे म्हणून जयने फोन ठेवला आणि समीरला उद्देशून म्हणाला,” बापटसाहेब होते. उद्योग मंत्रालयाचे सचिव. त्यांना बांगलादेशला एक सेमिनार आहे त्याकरीता प्रतिनिधी पाहिजे आहे.”

“त्यांना कळवा मी तयार आहे म्हणून.” समीर उतावीळपणे म्हणाला.

“अरे आधी पूर्ण ऐकून तर घे नंतर सांग काय ते. सेमिनार काही औद्योगिक नाही. ढाक्क्यातील सततच्या ट्रॅफीक जामच्या समस्येवर काय उपाययोजना करावी हा विषय आहे. आता तूच सांग, यावर तू काय बोलणार आहे?”

समीर यावर जरा विचारात पडला पण लगेच म्हणाला,” जर मला दोन आठवडे आधी निरीक्षण करायला मिळाले तर मी काही सुचवू शकेन. त्यासाठी मला दोघातिघा स्थानिक लोकांची मदत लागेल.”

“बापटसाहेब ते सहज जमवतील. तुला खात्री वाटते का? उगाच तेथे फजिती व्हायला नको.”

त्यानंतर रात्री जयने राधिकाशी बोलतांना म्हणाला,

“मला समीरचे वागणे जरा चमत्कारिक वाटते.”

“म्हणजे तो माधोपूरहून आल्यानंतर म्हणताय का?”

“हो. का तुलापण ते जाणवले काय?”

“जाणवले जरूर पण ते साहजिक नाही काय? ज्या माणसाने त्याला अंगाखांद्यावर खेळविले त्याच्या वियोगाने दुःख होणे स्वाभावीकच आहे.”

“दुःख होणे की समजू शकतो पण म्हणून बंगलादेशला बदल म्हणून जाणे हे कोड्यात टाकणारे आहे. आधी तो जायला तयार नव्हता आता केंव्हा जायचे म्हणून मागे लागला आहे. यामागे नक्कीच काहितरी गुढ आहे.”

“तू जरा त्या रहस्यकथा वाचणे बंद कर. त्यामुळे प्रत्येक गोष्टीतच तुला काहितरी गूढ दिसते.” असे म्हणून राधिकाने विषयाला पूर्णविराम दिला.

तशी तिलाही काळजी वाटतच होती पण हे असेच आडनीड वय असते त्यात असे व्हायचे हे म्हणून तिने स्वतःचे समाधान करून घेतले. एकवेळ शिवाला बोलावून काय ते विचारावे असेही तिला वाटले पण तिने ते टाळले कारण समीर जर जयजवळ बोलत नसेल तर तर कोणाकडेही बोलणार नाही याची तिला खात्री होती. इकडे समीरने ट्रॅफीक जाम आणि त्यावरचे उपाय यावर मिळेल ती माहिती वाचायचा सपाटा सुरु केला होता. तसेच बंगलादेश त्यातील मोठी शहरे, त्यांच्या समस्या यावर वाचन सुरू केले. अशातच एके दिवशी जयने त्याच्या हातात एक पत्र ठेवले. बंगलादेशचे राजदूत तारीक हसन यांचे निमंत्रण आहे. जाण्याआधी जरूर भेटा अशी विनंती आहे.

‘ठीक आहे. भेटू’ असे मोघम उत्तर देत समीरने पत्रातल्या मजकुरावर नजर टाकली. ठरावीक

नमुन्यातलेच पत्र होते. पण बदलत्या राजकीय वातावरणामुळे आधी जरूर भेटणे हा उल्लेख जरा त्याला नवीन वाटला. त्याने जयला त्याबद्दल विचारले.

“हो. तेथे लष्करी राजवट आली आहे आणि जनरल इरशाद सध्या सर्वेसर्वा आहे.

ही राजवट लोकशाहीवादी आहे हे सिध्द करण्याचा त्याचा आटापिटा चालला आहे. त्यासाठी त्याने स्वतःची जातीय पार्टी स्थापन केली आहे. लुटूपुटूच्या निवडणुकापण घेतल्या अर्थात तोच निवडून आला.”

“सेमिनारशी याचा काय संबंध?”

“तेच सांगतो. हे सेमिनार, शिष्टमंडळ भेटी यातून तो बाहेरच्या जगाला एकप्रकारे सांगू इच्छित आहे की सर्व आलबेल आहे. या गोष्टी यशस्वी झाल्याच पाहिजे अशी तंबी राजदूताला दिली असणार म्हणून हे पत्र.

एवढे बौद्धिक झाल्यावर राजदूताची भेट टाळणे अशक्यच होते. त्याप्रमाणे समीर राजदूताला भेटला. भेट फारच औपचारिक होईल असे समीरला वाटले होते तशी काही झाली नाही आणि त्याचे एकमेव कारण होते स्वतः राजदूत! तारीक हसन हे साडेसहा फूट उंचीचे, गोरेपान सोनेरी बारीक फ्रेमचा चष्मा वापरणारे व्यक्ती होते. माणूस नुसताच उच्चविद्याविभूषीत नव्हता तर अत्यंत संवादकुशल होता. सुरवातीच्या पाच दहा मिनिटातच त्याने समीरचा संकोच पूर्णपणे घालवला. नंतरच्या संभाषणाची सर्व सूत्रे त्याच्याच हातात होती हे सांगायला नको. समीरच्या अभ्यासू वृत्तीचे त्यांना फारच कौतुक वाटत होते. तुझ्यासारखे होतकरू तरुणच देश घडवतात असा त्याच्याकडून शेरा येताच समीरला भरून पावले. नुकतीच राजवट बदलल्याने काय काळजी घ्यावी हे थोडक्यात सांगून ते लगेच म्हणाले की तसा तुला काही प्रॉब्लेम येणार नाही पण समजा आलाच तर हा एक नंबर मी देतो त्यावर संपर्क कर पुढचे सर्व मी बघेन.

समीरची आश्चर्यचकीत मुद्रा बघून त्यांनी स्वतःच खुलासा केला की सध्या बंगलादेशात जरा भारतविरोधी कारवाया वाढल्या आहेत म्हणून ही सावधानता. याविषयी समीरला थोडीफार माहिती होती पण राजदूताने दखल घेण्याइतपत परिस्थिती झाली असेल असे त्याला वाटले नव्हते.

राजकारण हा काही समीरचा प्रांत नव्हता त्यामुळे समीरने काहीच उत्तर दिले नाही आणि मिटिंग संपली. मिटिंग संपवून बाहेर येत असतांनाच त्याला त्याचा कॉलेजमधील मित्र तपन दास अचानक भेटला. दोघांचीही कॉलेज नंतरची ही पहिलीच भेट होती.''अरे तपन.'' समीरने हाक मारली.

समीर म्हणत तो गळ्यातच पडला,''तू इथे कसा?'' सुरवातीचा आश्चर्याचा धक्का ओसरल्यावर तपनने विचारले.''बंगलादेशला जात आहे असे म्हणून समीर सर्व माहिती सांगितली आणि तू इथे कसा हे विचारले.

एक उसासा सोडून तपनने सांगितले. त्याचा मावसभाऊ जतीन सेन बंगलादेशला असतो. तो आणि त्याचे कुटुंबीय यांचा ठावठिकाणा गेले वर्षभर लागत नाही याकरिता तो येथे गेले दोनतीन महिने फेऱ्या मारत आहे.

“तारीक हसन काय म्हणतात?”

“ते खूप मदत करत आहे पण स्थानिक यंत्रणा अजिबात हलत नाही. भावाची सारखी काळजी वाटते. काय झाले असेल त्यांचे देव जाणे.”

सर्व ठीक होईल असा समीरने त्याला दिलासा दिला खरा पण तो पोकळ आहे हे त्याला कळत होते.

“समीर तू अनायसे तिथे जातच आहे तर तू तुझ्या पातळीवर जरा तपास करशील काय?” तपनने आशेने विचारले. मरता क्या न करता?

“जरूर. मी माझ्यापरीने प्रयत्न करेन.”समीर म्हणाला कसे काय हे त्यालापण माहित नव्हते. तपनने एक जुना फोटो ज्यात जतीन, त्याची बहीण सुलेखा आणि त्याचे आईवडील होते तो समीरला दिला. हे कुटुंब ढाक्याजवळ वीस पंचवीस किलोमीटर अंतरावर राणीगंज म्हणून एक उपनगर आहे तेथे गेली दहा वर्षे रहात होते. त्याभागात सतरंगीपुरा म्हणून एक भाग प्रसिद्ध आहे तेथे होते. आता काय झाले, कुठे गेले त्याची कल्पना नाही. तपन खेदाने म्हणाला.

“असा धीर सोडू नकोस. कदाचित त्यांचे सक्तीने धर्मांतर केले असेल.”

“तसे असते तरी जतीनने काहीही करून संपर्क केला असता. ती शक्यता मला वाटत नाही.”

“ठीक आहे. आपण इथे बसून उगाच काळजी करण्यात अर्थ नाही. मी तेथे जातोच आहे तर कसून प्रयत्न करेन.” समीर निर्धाराने म्हणाला. तुझ्याशी बोलून खरच मला फार छान वाटले. तिथून काही मदत लागली तर जरूर कळव असे तपन म्हणाला आणि परत भेटूया म्हणत आपल्या कामाला गेले.

----------*----------

# प्रकरण ५

रीतसर सर्व सोपस्कार पार पडले आणि दोनच आठवड्यानंतर समीर ढाक्याच्या विमानतळावर उतरला. तशी फारशी प्रवाश्यांची गर्दी नव्हती. चेकींग करतेवेळी समीरच्या पुढे एक उंचापुरा मध्यमवयीन गोरापान सरदारजी फक्त होता.

“तेजींदर बग्गा” चेकींगला उभे असतांना तो समीरला म्हणाला.

“समीर.” समीरने आपली ओळख सांगितली तेवढ्यात तेजींदरचा नंबर आल्याने संभाषण थांबले.

“पासपोर्ट प्लिज.” काऊंटरवरच्या अधिकारी तेजींदरला म्हणाला.

नेमका तेजींदरला पासपोर्ट काढायला जरा वेळ लागला कारण त्याच्या हातात बॅग होती.

“सर, जरा लवकर आटपा. आम्ही बंगलादेशात कोणालाही विना-पासपोर्ट प्रवेश देत नाही.” किंचित त्रासून तो अधिकारी म्हणाला. त्याबरोबर तेजींदरला राग आला. तेवढ्यात पासपोर्टपण त्याच्या हाती लागला. तो काढून त्या अधिकाऱ्याला देत तो खोचकपणे म्हणाला,”खरे की काय? माझ्या माहितीनुसार अंदाजे दोन लाख भारतीयांना तुम्ही विना-पासपोर्ट प्रवेश दिला होता.”

“सर, तुम्ही काहीतरी बोलायचे म्हणून बोलत आहात. असे होणे शक्यच नाही.” रागाने तो अधिकारी म्हणाला,”तुम्ही तुमचे म्हणणे सिध्द करा नाहीतर माफी मागा.”

“ऑगस्ट १९७१ ते फेब्रुवारी १९७२ या दरम्यान अंदाजे दोन लाख भारतीय शूरवीर बंगलादेश मुक्त करण्यासाठी बंगलादेशात विना-पासपोर्ट लढत होते. अजून काही बोलायची गरज आहे काय?” तेजींदर शांतपणे उत्तरला.

‘पीन ड्रॉप सायलेन्स’ म्हणजे काय हे समीरने नंतरची दोन मिनिटे अनुभवले. काही न बोलता त्या अधिकाऱ्यांने तेजींदरचे चेकींग आटपते घेतले. या छोट्याश्या चकमकीचा फायदा इतकाच झाला की समीरचे चेकींग लवकर आटपले. लाऊंजमध्ये येताच त्याच्या नावाचा फलक घेवून उभे असलेला इंटर कॉटिनेंटल होटेलचा माणूस त्याला दिसला. त्याच्यासमवेत तो होटेलच्या कारमधे जाऊन बसला. बघतो तर काय तेजींदरपण कारमधे आधीच स्थानापन्न झाला होता.

“प्लेझन्ट सरप्राईज अँड थँक्स.” समीर बसत म्हणाला.

“सरप्राईज ठीक आहे थँक्स कशाबद्यल?” बुचकळयात पडून तेजींदरने विचारले.

“अरे तू त्या अधिकाऱ्याला चांगलेच ठणकावले त्यामुळे माझे चेंकींग लवकर झाले म्हणून थँक्स.”

“असे होय. मग ठीक आहे.”असे म्हणत तेजींदर जोरात हसला,” तू इथे काय काम काढले?”

त्यावर समीरने त्याला आपल्या कामाचे स्वरूप थोडक्यात सांगितले. सर्व ऐकल्यावर तेजींदरची प्रतीक्रया म्हणजे डोक्याचे काम एवढीच होती. समीरच्या तू काय करतो या प्रश्नावर तो एवढेच म्हणाला की मी भारतीय दूतावासात डेस्क ऑफिसर आहे. म्हणजे कामाचे काय स्वरूप आहे या समीरच्या प्रश्नावर

'कमी तेथे आम्ही' एवढेच तेजींदरने सांगितले.

"तुला कसलीही मदत लागली तर मला या नंबरवर फोन कर."

ठीक आहे असे समीर म्हणेपर्यंत हॉटेल आले. दोघांच्याही रूम्स वेगवेगळ्या मजल्यावर असल्याने डिनरला भेटू असे ठरवून दोघेही आपआपल्या खोल्यात गेले. रात्री ठरल्याप्रमाणे दोघांनीही एकत्र जेवण केले. तेजींदर बोलका असल्याने दोघांचीही गट्टी लवकर जमली.

दुसऱ्या दिवशी सकाळा आठ वाजता फोन वाजला. समीरने झोपेतच फोन उचलला. हॉटेलची रिसेप्शनिस्ट फोनवर होती.

"गुड मॉर्निंग सर. तुम्हाला भेटायला दोन विद्यार्थी आले आहेत." ती म्हणाली.

"गुड मॉर्निंग." समीर म्हणाला पण

त्याला क्षणभर कळेना की कोण आपल्याला भेटायला आले आहेत म्हणून त्याने विचारले कसल्या संदर्भात. तिने त्यांना तसे विचारले आणि अदबीने समीरला सांगितले की कसल्यातरी सर्व्हेच्या संदर्भात म्हणत आहेत. आता समीरची ट्यूब पेटली.

"त्यांना रेस्टॉरेंटमधे बसायला सांग, मी दहा मिनिटात येतोच." असे सांगून दहा मिनिटात समीर सर्व आटपून खाली रेस्टारेंटमधे गेला. तशी फारशी गर्दी

नसल्याने समीरला बघताच दोघे तरुण पटकन उभे राहीले. समीरने त्यांना बसण्याची खूण केली.

“सॉरी. मला जरा उशीर झाला.” समीर म्हणाला,” मी समीर, आपली ओळख?”

“मी मकबूल आणि हा रफीक. आपणाला कसल्यातरी सर्व्हेकरिता स्वयंसेवक पाहीजे आहेत म्हणून आमच्या कॉलेजतर्फे आम्हाला पाठविण्यात आले आहे.” तेवढ्यात आलेल्या वेटरला ऑर्डर देत समीर म्हणाला,”जरूर. सर्व्हे ढाक्यातील ट्रॅफीक जामवर काही उपाय शोधावा याकरीता आहे. प्रथम मला सांगा तुम्हाला ढाक्याची कितपत माहिती आहे?”

“आमचा जन्म इथलाच आहे.”

“तुम्हा दोघांना दसवा मील कुठे आहे हे माहिती आहे काय?” समीरने विचारले.

“नाही.” रफीक आणि मकबूल म्हणाले.

“ठीक आहे. सर्व्हे करतांना जर या भागातले कोणी भेटले तर माहिती काढा.”

“काही विशेष?”

“एका मित्राची फॅमिली तिथे राहते एवढेच कळले आहे. जमले तर भेटून येईन.”

“ठीक आहे.”

“सर्व्हे करण्याचा काही अनुभव?”

दोघांचेही चेहरे जरा पडले. रफीक हळूच म्हणाला,” कसलाही नाही.”

त्यावर समीर आनंदाने म्हणाला,” हे तर फारच छान. मला अशीच माणसे पाहिजे होती.”

त्यावर त्यांचे गोंधळलेले चेहरे बघून त्याने घाईने पुस्ती जोडली,” म्हणजे तुमच्या मनात पूर्वग्रह नाही त्यामुळे काम लवकर होईल. आता मला हे सांगा ढाक्यातील जास्त ट्रॅफीक जाम होणारे भाग कोणते?”

“मोतीझील, गुलिस्तान, पलटन, शाहबाग, कावरान बाजार, मोहखाली. . .” दोघेही एकासुरात म्हणाले.

“पुरे पुरे.”समीर हसून म्हणाला,”आणि साधारणपणे सकाळी आठ ते एक आणि संध्याकाळी चार ते आठ या दरम्यान ट्रॅफीक जाम होते. बरोबर?”

आता चकीत व्हायची पाळी त्या दोघांची होती.

“तुम्हाला कसे माहिती?”

“सगळीकडे याच वेळात जाम असतो. त्यात विशेष काही नाही.” तेवढयात वेटर ऑर्डर घेऊन आला. खाणे सुरु होईपर्यंत समीर काही बोलला नाही.

खाणे झाल्यावर पाच-दहा मिनिटांनी समीर दोन फॉर्म त्यांना देत म्हणाला,” मी एक छोटीसी

प्रश्नावली केली आहे. ती तुम्ही भरून घ्यायची हे मुख्य काम आहे. आपल्याकडे अजून दहा दिवस आहे. सहा दिवस डेटा गोळा करायला, चार दिवस निष्कर्ष काढायला. तुमची तयारी आहे का हे करायला? काही सूचना असतील तर जरूर करा.”

"एवढ्या गर्दीत लोक हा फॉर्म कसा भरतील?"

"फॉर्म अगदी साधा आहे. फक्त बरोबर किंवा चूक एवढयाच खुणा करायच्या आहेत." त्यांना फॉर्म देत समीर म्हणाला." हा फॉर्म नीट वाचा आणि तुमच्यापण काही सूचना असल्यास जरूर सांगा."

दोघांनीही फॉर्म वाचायला सुरुवात केली. फक्त दहाच साधे प्रश्न होते. नाव, व्यवसाय, भाग, वाहन आणि वेळ एवढेच लिहायचे होते बाकी सर्व खुणा करायच्या होत्या. नीट वाचल्यावर रफीक म्हणाला," बस एवढेच. यानी काय होणार? या जामवरचे उपाय तर यात विचारलेच नाही?"

समीरला त्याच्या निरीक्षणाचे कौतुक वाटले. तो शांतपणे उत्तरला," आपल्याला कारणे शोधायची आहे. उपाय नाही. उपाय करणारे एक्सपर्ट या कारणांचा उपयोग करतील न करतील तो त्यांचा प्रश्न आहे. तज्ञांना त्यांचे काम करू द्यावे या मताचा मी आहे."

बहुधा असला विचार त्यांनी प्रथमच ऐकला असावा कारण ते यावर काही बोलले नाही. फक्त एवढेच म्हणाले की सुरवात कधी करायची.

"उद्या सकाळपासून. आज पेपरवर्क पूर्ण करू. आणखीन काही सूचना."

"आता अजून काय?"

"तुम्ही समजता तेवढे हे काम सोपे नाही. लोक जाममधे अडकल्याने आधीच वैतागले असतात त्यामुळे तुम्हाला ते सहकार्य करतीलच असे समजू नका. काहीजण चिडतील, तुम्ही कोण विचारणारे असे म्हणतील, याचा काय उपयोग हे ही ऐकवतील. तेव्हा डोके शांत ठेवायचे. आपण प्रत्युत्तर द्यायचे नाही.

कोणी सहकार्य करत नसेल तर त्याचा नाद सोडून द्या. दुसऱ्याला विचारा, कळले?”

मकबूल आणि रफीक दोघेही त्याच्याकडे जरा चकीत होऊन बघत राहिले. तसे पाहिले तर समीर त्यांच्यापेक्षा वयाने काही फारसा मोठा नव्हता आणि दिसतपण पोरसवदा होत त्यामुळे हा काय आपल्याला नवीन शिकवणार असे त्यांना आधी वाटले होते त्यामुळे सुरुवातीला त्यांनी समीरला फारसे गांभीर्याने घेतले नव्हते. पण बोलतांना, सूचना देतांना जसजसा समीरच्या अभ्यासू वृत्तीचा एक एक पैलू त्यांच्यासमोर उलगडू लागला तसे तर भारावून जात होते. आपोआपच त्यांच्यात गुरु-शिष्यांचे नाते प्रस्थापीत होत होते.

अजून थोड्या सूचना देणे झाल्यावर समीरने त्यांना प्रत्यक्ष डेमो करून दाखविला आणि त्यांच्याकडून पण करवून घेतला. त्यांची ग्रहणक्षमता चांगली असल्याने त्यांनी लवकरच पद्धत आत्मसात केली. हा सर्व व्याप उरकेपर्यंत संध्याकाळचे सहा वाजले होते. दुसऱ्या दिवशी आठ वाजता भेटण्याचे सांगून समीरने त्यांना सुट्टी दिली.

रात्री जेवणाचे वेळी परत तेजींदर भेटला. त्याच दिवशी तो दूतावासातच रहायला जाणार होता. परत भेटण्याचा वादा करून त्याने निरोप घेतला. अर्थातच तो सेमिनारला येणारच होता. बंगलादेशचे भारतातील राजदूत तारीक हसन हे पण येणार होते.

----------*----------

# प्रकरण ६

सर्व्हे सुरू झाल्यावर दसवा मील संदर्भात काही माहिती मिळते काय यावर तिघेही लक्ष ठेवून होते. सुरुवातीचे पाच दिवस तर कोणीच भेटले नाही. सहाव्या दिवशी मात्र रफीकला एक माणूस भेटला जो दसवा मीलहून येताना जाममधे अडकला होता. त्याच्या माहिसुतीनुसार तो भाग दरीयागंज या उपनगरात होता. अजून काही सोयी वगैरे नव्हत्या. दहा वर्षापूर्वी तेथे थोडी वस्ती होती ती आता वाढून पंधरा वीस हजार झाली होती. सर्व्हेची जबाबदारी एक दिवस या दोघांवर सोपवून समीर दसवा मीलकडे जायला निघाला.

समीर तिथे पोचला तेव्हा सकाळचे अकरा वाजले होते. मेघना हॉस्पिटल आणि सकिना नर्स एवढ्या तुटपुंज्या माहितीवर कसा काय पत्ता सापडेल याची त्याला शंका होती. शोधू तासभर नाहीतर जाऊ परत असा विचार करून त्याने शोध सुरू केला. अर्ध्या तासातच नकारघंटा ऐकून त्याला परत जावे असे वाटू लागले. शेवटचा प्रयत्न म्हणून तो एका किराणा दुकानात गेला. दोन्ही नावे ऐकून दुकानदाराने मेघना हॉस्पिटल तर केव्हाच नष्ट झाले पण सकिनादीदी मात्र नर्सिंग कॉलनीत राहते अशी माहिती पुरवली. समीर आश्चर्याने त्याच्याकडे बघतच राहिला.

“ही नर्सिंग कॉलनी कुठे आहे?” त्याने कसेबसे सावरून विचारले.

“इथून सरळ जा आणि पुढच्या चौकात उजवीकडे वळा. पंधरा-वीस क्वार्टर्स दिसतील. तीच नर्सिंग कॉलनी.” त्याने शांतपणे दुसऱ्या गिऱ्हाईकाला माल देतांना सांगितले. तरी पण काहीश्या शंकेनेच समीरने वाट तुडवू लागला.

ती कॉलनी त्याने शोधली. तिथे मात्र त्याला सकिनाचे घर शोधण्यास काही वेळ लागला नाही. घराची कॉलबेल वाजवताच एका विशीतील सुंदर तरुणीने दार उघडले. शेलाटा बांधा, गव्हाळी वर्ण आणि सुरेख डोळे, जे यावेळी समीरकडे रोखून बघत होते.

“सकिनादीदी है?” समीरने विचारले.

हिच्या होकारावर किंवा नकारावर आता पुढचे सारे अवलंबून होते.

“आहे. आपण?” तिने विचारले.

“मी समीर.” एवढे म्हणेपर्यंत आतून एक चाळिशीतील स्त्री ‘कोण आहे जुलेखा’ असे म्हणत बाहेर आली. साधारणपणे आपल्या पेशाचा आपल्या राहणीवर परिणाम असतो. जशी वैद्यकीय पेशातील व्यक्ति सहसा नीटनेटकी आणि व्यवस्थित असते तशी सकिनापण होती. त्यामुळे दिसायला जरी साधारण असली तरी तिची समोरच्या व्यक्तिवर चांगलीच छाप पडत असे. तिच्या चेह-यावर एकदम प्रकाश पडल्याने तिला समीरचा चेहरा नीटसा दिसत नव्हता म्हणून तिने डोळ्यावर हात ठेवून निरखून बघितले. समीर नीट दिसू लागल्यावर ती अभावितपणे म्हणाली,

“कौन?”

आपण योग्य ठिकाणी पोहोचलो आहोत याची त्याला अंतर्मनाने ग्वाही दिली.

“मी समीर शिलेदार.”

“पुढे काही बोलू नकोस.” ती हरखून म्हणाली.” माझा तर विश्वासच बसत नाही.” विस्मयाचा, आनंदाचा पहिला बहर ओसरल्यावर ती हमसून रडू लागली. तिच्या असल्या वागण्याने समीर संकोचून गेला आहे हे बघताच जुलेखा एकदम पुढे सरसावली आणि सकिनाला गदगदा हलवून म्हणाली,” दीदी, स्वत:ला संभाळ.” त्यासरशी सकिना एकदम भानावर आली आणि शांत झाली. हा सर्व प्रकार संकोचाने बघण्याऱ्या समीरच्या मनात एकच विचार आला की जुलेखा नुसतीच दिसायला सुंदर नाही तर या सुंदर खांद्यावर एक डोके आहे आणि ते कसे वापरायचे हे तिला माहिती आहे. सौंदर्य आणि बुद्धी यांचा विरळा मिलाफ असा विचार मनात येऊन तो अस्फूटसा हसला पण जुलेखाचे तिकडे लक्ष नव्हते. सकिना शांत झाल्यावर तिने किंचीत क्षमायाचनेच्या दृष्टीने समीरकडे बघितले.

“माफ कर समीर.”

समीरने पुढे सरसावून तिचे दोन्ही हात आपल्या हातात घेतले आणि म्हणाला,” काही मनावर घेऊ नकोस. असे होणे साहजिक आहे.”

“आतातरी यानंतर मला मेजरसाबची रेकॉर्ड ऐकावी लागणार नाही.” जुलेखा नाटकीपणाने म्हणाली.

‘चुडेल’ असे म्हणत सकिनाने तिला एक धपाटा घातला आणि समीरला ती म्हणाली,” माझा पत्ता तूला कसा सापडला.”

त्यावर रामशरणपासूनचा सर्व वृत्तांत समीरने सांगितला. तिला ते सर्व ऐकून फारच दुःख झाले पण एवढ्याश्या धाग्यावरून समीर इथपर्यंत आला याचा तिला आनंदपण झाला.

“बघ याला म्हणतात खरी ओढ. नाहीतर तू. दिवसभर मला छळत असते.” ती जुलेखाला कृतककोपाने म्हणाली.

समीरने तो जीर्ण फोटो तिला दाखविला. त्या फोटो मागे लिहिलेले तिला दाखविले. यातील अशफाक कोण हे तिला विचारले.

“हॉस्पिटलवर हल्ला करण्याऱ्या पाकिस्तानी कुत्र्यांचा प्रमुख. सध्या फरारी युध्द गुन्हेगार.” तिने सहजतेने सांगितले.

“हा सध्या कुठे आहे? म्हणजे पाकिस्तान की बांगलादेश?”

“बंगलादेशातच आहे.”

“तू इतक्या ठामपणे कशी काय म्हणू शकते?”

“मी त्याचा चेहरा कधीच विसरू शकणार नाही. एका सार्वजनिक समारंभात मी त्याला बघितले होते. बहुधा डेली इत्तेफाकमध्ये बातमीपण होती. त्यामुळे तो सावध झाला आणि फरार झाला.”

“ही जुलेखा कोण? मला अजून कळले नाही.” समीरने विचारले.

या प्रश्नावर दोघीही गंभीर झाल्या. सकिना एक उसासा सोडून म्हणाली,” ती एक वेगळीच कहाणी आहे. युद्ध संपल्यावर दोन तीन वर्षे घडी बसण्यात गेली पण युद्धकाळात काही लोकांनी पाक सैन्यात असतांना आपल्याच

लोकांवर असंख्य अत्याचार केले होते. त्यातले काही लोक आता उजळमाथ्याने समाजात फिरत आहे हे बघून

सर्वसामान्य जनता चिडली नसती तर नवलच. लोकांपुढे नमून सरकारने युद्ध गुन्हेगारांविरुद्ध मोहीम उघडली खरी पण किरकोळ गुन्हेगारच पकडल्या गेले. मुख्य सूत्रे हलविणारे जवळपास दोनशेजण तरी अजून फरार आहेत.''

''पण याचा जुलेखाशी काय संबंध?'' समीरने विचारले.

''मी आता जेवणाची तयारी करते तो पर्यंत तुला ते कळेल.'' जुलेखा मिश्कीलपणे म्हणाली आत गेली पण.

तिच्याकडे विषादाने बघत सकिना म्हणाली,'' बिचारी हसून दिवस साजरा करते. हिचे कुटुंब आमच्या शेजारी रहात होते. आमचा खूपच घरोबा होता. या गुन्हेगार शोध मोहिमेमुळे आपसातील संशय वाढीला लागला होता. मुस्लिम धर्मांधता परत डोके वर काढू लागली होती. त्या लोकांनी तर जमाते इस्लामी हा एक कट्टर पक्षही काढला आहे. छोट्या मोठ्या दंगली घडवून आणणे, विरोधकांना टिपून ठार मारणे हेच यांचे काम. जमना फार्मा या एका मोठ्या औषधी कंपनीत हिचा भाऊ चांगल्या पोस्टवर होता. अशाच एका दंगलीत तो सापडला आणि आजतागायत त्याचे काय झाले हे कळले नाही. ही माझ्याकडे आल्याने वाचली. यथावकाश सावरल्यावर तिने आपले शिक्षण पूर्ण केले आणि आता सिटी हॉस्पिटलमधे नर्सिंगचा कोर्स पूर्ण करून प्रोबेशनवर काम करीत आहे. मी पण तिथेच काम करते आणि मला नुकतेच राहण्यासाठी क्वार्टर मिळाले आहे. खरे म्हणजे आम्ही दोघीही सुट्टीच्या दिवशी येऊन थोडे थोडे सामान तिकडे नेतो.''

समीर सुन्न होऊन सर्व ऐकत होता. त्याने सहज विचारले,''म्हणजे जुलेखा तुमच्या कुटुंबियापैकी नाही?''

"नाही आणि जरा हळू, तिलापण असे म्हटलेले आवडत नाही."

"पण मग तिचे नाव?"

"सुलेखा सेन.''जुलेखा बाहेर येत म्हणाली.

"आणि तुझ्या भावाचे नाव?"

"जतीन सेन."

समीर दिगमूढ होऊन बघतच राहिला. आश्चर्याचा धक्का ओसरल्यावर त्याने हळूच विचारले," तपन दास नावाचा तुझा कोणी नातेवाईक हिंदुस्थानात आहे का?"

"तपन दास," सुलेखा विचारात पडली." जतीनदाच्या बोलण्यात कधीकधी नाव यायचे खरे पण मला त्यांच्याबद्दल

काहीच माहिती नाही."

"मला तपन दासनेच तुमचा शोध घेण्यासाठी पाठविले आहे. तपन जतीनचा मावसभाऊ आहे. तू त्याला कधी बघितले नसशील. सध्या पुण्यात असतो. तुमच्याकडून काहीच खबरबात नसल्याने सारखा दिल्लीत फेऱ्या मारत असतो. अशाच एका फेरीत तो मला भेटला होता."

"संपर्क करण्यासाठी काहीही नव्हते माझ्याकडे. शिवाय धर्मांध लोकांकडून वाचविण्यासाठी मला नावपण बदलावे लागले. जागा, नाव बदलून शिक्षण घेणे कठीण होते पण दीदीमुळे निभावले."

यानंतर मात्र सकिनाने सर्व सूत्रे हाती घेतली आणि प्रथम सर्वांनी जेवून घेतले. जेवणे होताच तिघेही एकत्र बसले. पुढे काय करावे याबद्दल विचार विनिमय करू लागले.

"समीर, तुझ्यामुळे माझी एक काळजी दूर झाली बघ. आता सुलेखाची जबाबदारी तुझ्यावर."

"आणि तुझी का नाही? तुम्ही दोघीही माझ्याबरोबर हिंदुस्थानला चला."

"तू सुलेखाला नेऊ शकतोस पण मी येणार नाही."

"का?"

"चांगला असो की वाईट असो हा माझा देश आहे आणि तो सोडून मी जाणार नाही." सकिना गंभीरपणे म्हणाली.

"एवढेच ना? अगदी आताच काही आपण निघालो नाही. अजून महिना-दोन महिने विचार कर नंतर ठरव." समीर म्हणाला," आणि आताचे म्हणशील तर हे सर्व सामान पॅक कर आणि क्वार्टरला रहायला चल. उगीच फेऱ्या मारायची गरज नाही."

सकिनाला अधिकारवाणीने सांगणारा कोणीतरी पहिल्यांदाच भेटला असावा. त्यामुळे जे काही थोडेसे सामान राहिले होते ते पॅक करून टेम्पोत टाकून रात्री नऊ वाजता तिघेही सिटी हॉस्पिटलच्या क्वार्टरवर पोचले. तेथून समीरचे हॉटेल फारसे दूर नव्हते. रात्री अकराला समीर हॉटेलला पोचला.

दुसऱ्या दिवशी समीरने रफीकचे मनापासून आभार मानले आणि परत सर्व्हेच्या कामात स्वतःला पूर्णपणे झोकून दिले. आता काम तसे आटपतच आले होते पण समीरला कामात स्वतःला झोकून द्यायची सवय होती. त्यामुळे

नंतर सेमिनार आटपेपर्यंत तो हे दसवा मील प्रकरण पूर्णपणे विसरून गेला. एकदम सेमिनारच्या दिवशी त्याला या दोघींची आठवण झाली. त्याने दोघींनाही सेमिनारला बोलावले पण कामामुळे येऊ शकणार नाही असे त्यांनी कळवले.

----------*----------

## प्रकरण ७

नंतरचे चार-पाच दिवस समीरची फारच धावपळ झाली. रोज वेगवेगळयात भागात जाणे, तेथील जाममधे अडकलेल्या लोकांना भेटणे, फॉर्म भरणे, रात्री उशीरापर्यंत वर्गीकरण करणे यात तो इतका व्यस्त झाला की त्याचे खाण्यापिण्याकडेपण दुर्लक्ष होऊ लागले. तेवढे सोडले तर डेटा व्यवस्थित गोळा होत होता. रोज साधारणपणे तिघे मिळून हजारतरी फॉर्म भरत असत. समीरने सांगितलेले बहुतेक सर्व अनुभव मकबूल आणि रफीक अनुभवत होते त्यामुळे त्यांचा समीरविषयीचा आदर द्विगुणीत झाला होता. आठवड्यानंतर पुरेसा डेटा जमा झाल्यावर समीरने त्या दोघांना आता आला नाही तरी चालेल असे सांगितले. पण दोघेही त्याला तयार नव्हते.

“सर. आम्हालापण उत्सुकता आहे की विश्लेषण झाल्यावर काय निष्कर्ष येईल म्हणून आम्ही रोज येणार.”रफीक म्हणाला.

समीरने आनंदाने त्यांना परवानगी दिली. वेळेवर काय मदत लागेल याची त्यालाही कल्पना नव्हती म्हणून असे स्थानिक माहितगार हाताशी असले तर बरेच होते. त्याने त्याच्यासाठी सेमिनारच्या पासेसचीपण सोय केली. समीरने नंतर रात्रंदिवस काम करून विश्लेषण पूर्ण केले. सेमिनारच्या एक दिवस आधी भाग घेणाऱ्या सर्वांची बैठक आयोजकांनी घेतली. प्रत्यक्ष प्रेझेंटेशन करतेवेळी काय मदत लागेल याबद्दल त्यांनी विचारणा केली. बहुतेक सर्वांनी ओव्हरहेड प्रोजेक्टर, व्हीडिओ अशी उपकरणे लागतील हे सांगितले अर्थात समीर सोडून.

समीरला त्याबद्दल विचारताच त्याने यातले काहीही नको असे नम्रपणे सांगितले. फक्त सहभाग घेणाऱ्या सर्वांची नावे असणारा एक बोर्ड आणि त्यांनी सुचविलेल्या उपाय योजनामुळे ट्रॅफीक जाममधे होणारी सुधारणा टक्केवारीत दर्शवावी एवढेच सुचविले. टक्केवारी प्रत्येक वक्त्याच्या भाषणानंतर दाखवावी हे पण आर्वजून सांगितले.

विशेष खळखळ न करता सर्वांनी ही सूचना मान्य केली. नंतर प्रश्न आला वेळेचा. प्रत्येकालाच अर्धा ते पाऊण तास बोलायचे होते. परत समीर सोडून! त्याला विचारताच त्याने दहा मिनिटे पुरेशी आहेत हे सांगितले आणि माझी जास्तीची वीस मिनिटे बाकीच्यांना दिली तरी चालतील असेही सांगितले.

‘काही सांगण्यासारखे नसेलच तर बोलणार तरी काय? ’मागून एक खोचक प्रतिक्रिया आलीच.

“तसे समजा. तुम्ही किती उजेड पाडता ते बघूच.” समीरने ठणकावले.

‘ व्यक्तिगत टिकाटिप्पणी नको’ असे म्हणून संयोजकानी मिटिंग आटोपती घेतली. सेमिनारच्या दिवशी चार देशांच्या वक्त्यांची नावे बोर्डवर झळकली. सर्वात शेवटी समीरचे नाव होते आणि नावापुढे फक्त उद्योजक, उद्यम इंडस्ट्री एवढेच लिहिले होते. बाकी वक्ते आपापल्या क्षेत्रातील अधिकारी होते तसे त्यांच्या नावापुढे लिहिले होते. वाहतूक आणि दळणवळण क्षेत्रातील त्यांचा भरघोस अनुभव, त्यांनी केलेले भरघोस अनुदान पण लिहिले होते. समीरच्या सूचनेनुसार मंचावर एक डिस्प्लेबोर्ड बसविण्यात आला होता. त्यावर चौघांचीही नावे देश व अपेक्षीत सुधारणा (टक्के) असे दोन भाग होते. टक्केवारी प्रत्येकाच्या भाषणानंतर भरण्यात येणार होती.

अपेक्षित असलेले सर्व मान्य झाल्याने समीरने संयोजकांचे आभार मानले. नंतर विशेष काही करण्यासाठी नसल्याने तो सरळ हॉटेलला परतला आणि सर्व्हेचे काम तपासू लागला.

----------*----------

# प्रकरण ८

सेमिनारच्या दिवशी सकाळी आठ वाजता समीरचे काम पूर्ण झाले होते. हातातील टिपणांवर ओझरती नजर टाकून त्याने समाधानाचा निश्वास सोडला. काय बोलायचे हे त्याच्या मनात ठाम झाले होता. आता तीन वाजेपर्यंत याकडे लक्ष द्यायचे नाही हे त्याने मनाशीच ठरविले.

समीरची एक सवय होती. असे काही महत्त्वाचे करायचे असेल तर तो त्या घटनेच्या चार-पाच तास आधीपासून पूर्णपणे अलिप्त राहण्याचा प्रयत्न करीत असे. त्यासाठी तो पूर्णपणे वेगळ्याप्रकारे मन रमवीत असे जसे आवडीची गाणी ऐकणे, पोहणे, एकादे पुस्तक वाचणे, फिरायला जाणे वगैरे. यातले काय करता येईल हा मनाशीच विचार करीत असता हॉटेलचा सर्व्हिस बॉय आला. समीरने त्यात सहजच विचारले,''तो दूर अंतरावर एक चौक दिसत आहे. तिथे काय आहे?''

“तिथे शहीद स्मारक आहे आणि लष्कराचे संग्रहालय आहे.”

“दोन तासात जाऊन येणे होईल?”

“पायी जाल तर लवकर याल.”

नकळत समीरला हसू फुटले. तयार होऊन अर्ध्या तासातच स्मारकापाशी पोचला. १९७१ साली जे जवान शहीद झाले त्यांच्या स्मरणार्थ सुरेख स्मारक उभारले होते. एक जमिनीवर खोचलेली रायफल आणि त्यावर अडकवलेले

हेल्मेट एवढेच शिल्प होते. स्मारकावर सर्वांची नावे, हुद्दे आणि तारीख होती. आजूबाजूला छान हिरवळ जोपासली होती. तुरळक माणसे होती. सर्वत्र शांतता होती. थोड्या अंतरावर मिलिटरी रेकॉर्ड रूम अशी पाटी समीरला दिसली. समीरनी संग्रहालय कोठे दिसते काय म्हणून आजूबाजूला बघितले पण काही दिसले नाही. चला इथेच चौकशी करू असा विचार करून समीर त्या ऑफीसमधे गेला. तशी ती ब्रिटिशकालीन छोटेखानी दुमजली इमारत होती. कदाचित खाली रेकॉर्ड रुम असेलही. व्हरांड्यातच चौकशी कक्ष होता. बाजूला एक मोठा हॉल. चौकशी कक्षात एक साठीच्या आसपासचा माणूस काहीतरी लिहीत बसला होता. तसे ऑफीस निर्मनुष्य होते. समीरला बघताच त्या माणसाने आपले लिहिणे थांबवले आणि विचारले,

“शुप्रोभात, आमि आपनार जोन्नो की कोरते पारी?” गेले आठ-दहा दिवस सर्व्हे करतांना मकबूल आणि रफीक बरोबर राहून समीरला ही सलामी पाठ झाली होती. तसेच थोडेफार संभाषण पण जमत होते

“विशेष काही नाही. इथे वॉर म्युझीयम आहे असे कळले म्हणून मी आलो.”

“आपण अगदी योग्य जागी आला आहात. मी इरफान इथला लायब्ररीयन. कृपया या रजिस्टरमधे नोंद करा आणि नंतर आपल्याला पाहिजे ते शोधा, लिहा, वाचा.” तो शांतपणे म्हणाला.

समीरने नोंद केली. पत्ता अर्थात हॉटेलचा दिला. राष्ट्रीयत्त्वाचा रकाना काही नव्हता त्यामुळे तो प्रश्न उद्धवला नाही. समीरने लिहिलेले वाचत इरफान म्हणाला,” तुमि कोथा थेके आसचो?”

“हिन्दुस्थान.”

“ओ हो, मग तर तुम्ही आमचे खास मेहमान आहात. बेफिक्र रहा. काय पाहिजे ते वाचा.” असे म्हणत त्याने समीरला लायब्ररी उघडून दिली.

बंगलादेशात असा अनुभव समीरला बरेचदा आला होता. त्यामुळे त्याला यात काही विशेष वाटले नाही. पण ही आदब जरा अनाठायी आणि कृत्रिम वाटत होती. वरकरणी तसे काही न दर्शविता समीर शांतपणे एक एक कपाट निरखून बघू लागला. सर्व कपाटे १९७१ च्या युद्धावरील पुस्तकांनी खच्चून भरली होती. ते साहजिकच होते कारण देशाचा जन्म होऊनच मुळी जेमतेम दहा वर्षे झाली होती. एक धावती फेरी मारून तो परत पहिल्याजागी आला.

“आपण काही विशिष्ट माहिती शोधत आहात काय?” समीरला परतलेला बघून इरफान विचारू लागला.

“होय.”

“कोणती? कदाचित मी काही मदत करू शकेन.”

“मला एका युद्ध गुन्हेगाराची माहिती पाहिजे आहे.”

क्षणभर इरफान चमकला. पटकन सावरून त्याने विचारले,

“नाव, रेजीमेन्ट वगैरे काही?”

“फक्त नाव माहिती आहे. अशफाक. ७१च्या युद्धात आधी पाकिस्तानकडून लढला पण पारडे फिरताच मुक्ती वाहिनीत सामील झाला.”समीरने खड़ा टाकला

“नाव तर फारच प्रचलीत आहे आणि असे बरेच संधीसाधू नंतर पाकिस्तानात पळाले. तसा हा पण पळाला असेल.”“नाही. तो पाकिस्तानमधे नाही.”

“असे कोण पाकिस्तानची ISI म्हणते आणि तुम्ही विश्वास ठेवता?”

“नाही. इस्त्राईलची मोसाद म्हणते.”

“काही पुख्ता सबूत? नाही म्हणजे आमच्या लायब्ररीत पण तसा ठेवता येईल.”

“डेली इत्तेफाक, ढाका १० एप्रिलचा अंक.”

इरफानला यावर पुढे काहीच बोलता येईना.

कसेबसे हसून तो म्हणाला,”मी जरूर तो अंक मिळवेन. बरे झाले तुमच्यामुळे मला हे कळलेतरी.

“आता शांतपणे बसा आणि काय पाहिजे जे वाचा, लिहा, टिपणे काढा. चा खाबे?”

बंगालीत सगळे द्रव पदार्थ खातात (खाबे) इथपर्यंत समीरची प्रगती झाली होती आणि तुम्ही हो, नाही काहीही म्हणले तरी चा (चहा) घ्यावाच लागतो हे माहिती असल्याने समीर ‘खाबे’ म्हणाला.

त्याबरोबर वयाला न साजेश्या चपळाईने तो गेलापण. समीरने वॉर क्रिमीनल असे लिहीलेले कपाट उघडले. सर्व पुस्तके प्रकाशन वर्षानुसार वर्गवारी करुन ठेवली होत. समीरने १९७१/७२ ही वर्षे पूर्ण पालथी घातली. बहुतेक सर्व पुस्तके त्याने आधीच वाचलेली होती. त्याला नवीन असे काहीच मिळाले नाही. संदर्भ ग्रंथांचा नाद सोडून तो वर्तमानपत्रे चाळू लागला.

इत्तेफाकच्या १० एप्रीलच्या अंकात (जो ईरफानने आपल्याकडे नाही असे सांगितले होते) एका छोट्याश्या कॉलममधे त्याला तो फोटो दिसला. कसलातरी समारंभ होता. ग्रुप फोटोमधे एकाच्या चेह-यावर वर्तुळ करून खाली लिहीले होते ‘कुप्रसिद्ध युद्ध गुन्हेगार अशफाक. ’ बातमी त्रोटक होती. त्यात फक्त संशय व्यक्त केला होता. दुजोरा मोसादचा दिला होता. मग इरफान खोटे का बोलत होता? .

पेपर परत जागी ठेवून समीर मागे वळला तोच चहा घेवून येणाऱ्या इरफानला जवळपास धडकलाच असता पण बचावला.

“सुधु सतर्क हा.” इरफान म्हणाला आणि त्यानी चहाचा कप समीरला दिला.

“सॉरी.”

“काही सापडले का?”

“नाही. बरेच शोधले.” समीरने ठोकून दिले,” पण तुम्ही लायब्ररी फार छान ठेवली आहे.”

त्याबरोबर इरफान खुलला आणि हे केवढे महत्वाचे आणि मेहनतीचे काम आहे पण त्याची कोणाला कदर नाही यावर त्याची टकळी सुरू झाली. समीरला अर्थात त्यात काही इंटरेस्ट नव्हता. चहा संपताच त्याने इरफानचे आभार मानले व सरळ बाहेरचा रस्ता धरला. तसेही त्याला आता सेमिनारचे वेध लागले होते. समीर गेटबाहेर पडून दिसेनासा होईपर्यंत इरफान त्याच्याकडे बघत होता. तो दिसेनासा होताच तो हळूहळू चालत जागेवर जाऊन बसला. थरथरत्या हाताने त्याने रुमालाने कपाळावरील घाम पुसला. एक नंबर फिरविला. बरोबर सातव्या

रिंग नंतर पलीकडून फोन उचलल्या गेला. एक जाड खर्जातल्या आवाजाने विचारले,”कहो.”

“जनाब, आपके बारेमे पूछताछ हो रही थी.”

“नाम, पता.”

“समीर. इंटर कांटीनेंन्टल होटेल.”

“कोई खास बात?”

“बहुत सवाल पूछ रहा था. जानकारी भी बहुत थी.”

“ठीक हैं.” आणि फोन कट झाला.

सुटकेचा एक निश्वास टाकून इरफानने फोन ठेवला. असे एक-दोन फोन महिन्याला होत असत आणि संध्याकाळी त्याच्या ड्रावरमधे एका जाडजूड खाकी लिफाफा मिळत असे. त्यात दोन हजार टके भरलेले असत. हे कोण ठेवतो, कधी, या माहितीचा काय उपयोग हे त्यानी कधीही शोधण्याचा प्रयत्न केला नव्हता. तशीच अट होती. त्याने कधीही तसा प्रयत्नपण केल नव्हता. नाहीतरी लायब्ररीच्या तुटपुंज्या पगारात कसे भागणार होते.

दहा मिनिटांनी दुसऱ्या एका फोनची रिंग वाजली. येथे मात्र पहिल्याच रिंगला फोन उचलल्या गेला. पलिकडे तोच जाड खर्जातला आवाज होता. ओळख न देता सांगू लागला,

“समीर, हिन्दुस्तानी, इंटरकॉटीनेंटल हॉटेल. आजकी शाम आखरी शाम.” आणि फोन कट झाला.

ऐकणारा सिराज मात्र आनंदीत झाला. तो एक पेशावर मारेकरी होता. आतापर्यंत त्याचा फोटोपण पोलीसांकडे नव्हता कारण तो काहीही पुरावा मागे

सोडीत नसे. भले मग त्यासाठी एसादा खून जास्ती करावा लागला तरी! औदार्य इतके की या जादा खूनाचे तो पैसे घेत नसे. फक्त अशी कुणकुण होती की कोणा कबीर नावाच्या एस. पी. ने त्याला पाहिले होते. त्याला पण आता पाच वर्षे झाली होती. एवढाच एक ठपका, आता त्याला ठपकाच म्हटले पाहिजे, त्याच्या काळ्याकुट्ट कारकिर्दीवर होता. असे एक दोन फोन जर महिन्यात आले तर त्याचे नंतरचे सहा सात महिने तरी मजेत जायचे. सर्व पैसे खर्च झाल्यावर परत फोनची वाट बघणे. उधळा आणि चैनी स्वभाव यामुळे तो एका जागी टिकत नसे पण यामुळेच त्याचा ठावठिकाणा अजूनपर्यंत तरी कोणाला लागला नव्हता. एका छोटेखानी फ्लॅटशिवाय त्याच्याजवळ काहीही नव्हते.

असू द्या, आज रात्री जर काम पूर्ण करायचे असेल तर संध्याकाळी सहापासून तयारी करावी लागेल असे पुटपुटत तो तयारी करु लागला.

तयारी म्हणजे सावज कोठे गाठावे, किती वेळ दबा धरून बसावे, काम झाल्यावर कोणत्या रस्त्याने जावे असे बारीकसारीक तपशील असत.

----------*----------

## प्रकरण ९

अन्वर हुसेन, ढाक्याचे आय. जी (इन्स्पेक्टर जनरल), ट्रॅफिक जाम आणि त्यावरची उपाययोजना या विषयावरील आयोजीत सेमिनारची निमंत्रण पत्रिका वाचत होते. तारीक हसन, बंगलादेशचे भारतातील राजदूत प्रमुख पाहुणे म्हणजे सुरक्षाव्यवस्थेची जबाबदारी आलीच. शिवाय प्रोटोकोलप्रमाणे ते जाईपर्यंत उपस्थिती आवश्यक. तेवढ्यात पी. ए. आत आला.

"कबीर आला आहे."

"लगेच पाठव." दुसऱ्या मिनिटाला कबीर आत आला. उणीपुरी सहा फुट उंची, गोरापान वर्ण, मजबूत शरीरयष्टी आणि या सर्वांना मात करणारे भेदक घारे डोळे. कडक सॅल्यूट ठोकून त्याने हातातील फाईल टेबलवर ठेवली. त्याला बसायची खूण करत आय. जी त्याला म्हणाले," काय प्रगती?"

त्यांच्या या विचारण्यामागे एक पार्श्वभूमी होती कारण कबीर हा एक रिपोर्टसपेक्षा प्रत्यक्ष कामावर विश्वास ठेवणारा माणूस होता. त्याचे खबऱ्यांचे नेटवर्क अतिशय मजबूत होते. अपराध्याला अटक करणे, नंतर न्यायनिवाडा होऊन त्याला शिक्षा करणे यातील कालापव्यय त्याला अजिबात मंजूर नव्हता. तो गुन्ह्याचा तपास अगदी मुळापर्यंत जाऊन जरूर करत असे पण त्याने गुन्हेगार फारच कमी पकडले होते. बहुतेक वेळा ते अटकेच्या वेळी प्रतिकार करतांना मारल्या जात. यात कबीरचा दोष होता असेही नाही कारण खातेनिहाय

चौकशीत तो नेहमीच निर्दोष सुटत असे. काही वाचलेले, पकडलेले गुन्हेगार दुर्दैवाने चालू शकत नसत एवढेच.

“एक-दोन आठवड्यात पूर्ण होईल. काही महत्वाचे क्लू मिळाले आहेत.”

“ते फाईलमधे नसतीलच.” हुसेनने विचारले. यावर कबीर काहीच बोलला नाही.

“या तपासाशी संबधित सर्व व्यक्ती अजूनतरी जिवंत आहेत ना? कोर्टात येऊ शकतील ना?” हुसेनची सरबत्ती चालूच ठेवली.

“सर.” कबीर अस्वस्थ होऊन म्हणाला.

“बर ते जाऊ दे.” निमंत्रण पत्रीका त्याला देत हुसेन म्हणाला.” एक सेमिनार आहे आणि राजदूत आल्यापासून ते जाईपर्यंत सुरक्षेची जबाबदारी आपली आहे.”

“यस सर.” म्हणून कबीर ताबडतोब उठला आणि केबीनच्या बाहेर गेला. त्याला अजून काही प्रश्नोत्तरे नको होती. त्यापेक्षा हे सुरक्षेचे काम परवडले. ऑफीसमधे आल्याबरोबर त्याने प्रथम निमंत्रणपत्रीका नीट वाचली. विषय वाचून तो जरा चक्रावला. आता या विषयी पण आम्हाला बाकीचे देश शिकवणार तर असा त्याच्या मनात विचार आला. त्यानी प्रत्येक वक्त्याला दिलेला वेळपण वाचला. समीरला दहा मिनिटे दिलेली बघून त्याला नवल वाटले आणि त्याचे कुतूहल जागे झाले. बघूया त्यादिवशी कळेलच असा विचार करून तो बाकीच्या तयारीला लागला. ठरल्या वेळी म्हणजे चार वाजता सेमिनार सुरु झाला. सुरुवातीच्या तीनही वक्त्यांची भाषणे उत्तम झाली. निरनिराळे चार्टस, फोटो यांची रेलचेल त्यांच्या प्रेझेंटेशनमधे होती. सर्वांचा भर

सिग्नल व्यवस्था अत्याधुनिक करणे, फ्लायओव्हर ब्रिजेसची संख्या वाढवणे यावर जास्त होता. प्रत्येकाच्या भाषणानंतर अपेक्षीत सुधारणा सात ते दहा टक्के होईल असे दाखविण्यात झाले.

"रफीक, आपले सर तर सर्वात शेवटी बोलणार आणि आपण तर एवढी काही तयारी केली नाही." मकबूल म्हणाला

"गप्प बैस. त्यांनी नक्की काहीतरी विचार करुनच सर्व्हे केला आहे. वाघ शिकार करण्याआधी जरा मागे सरकतो तसा काहीतरी प्रकार होईल. तू बघच."

"तू म्हणतो तसे झाले तर बरे होईल नाहीतर आपले काही खरे नाही." असे म्हणून मकबूल गप्प बसला. समीरची पाळी आल्यावर समीर शांतपणे उठला. बराच वेळ झाल्याने श्रोत्यांमधे चुळबूळ सुरु झाली होती. सर्वांना संबोधून झाल्यावर समीरने सरळ मुख्य मुद्दा मांडायला सुरवात केली.

तुम्हा सर्वांना घरी जायची घाई झाली असेल याची मला कल्पना आहे नाहीतर कदाचित एखादया जाममधे अडकायची तुम्हाला भिती वाटत असेल हेही मी समजू शकतो अशी जराशी मिस्किलपणे समीरने सुरवात करताच एक मंद हास्याची लकेर सभागृहात उमटली. आता श्रोते ऐकायच्या मनःस्थितीत आले हे ताडून तो म्हणाला,

"माझ्यावर विश्वास ठेवा मी तुमची फक्त दहा मिनिटे घेणार आहे."अशी मखलाशी करत समीर पुढे म्हणाला,"माझ्या आधीच्या व्यासंगी वक्त्यांनी निरनिराळे उपाय सुचविले आहेत. काळाच्या ओघात आज ना उद्या ते आपल्याला करावे लागतीलच यात काही संशय नाही. पण या सर्वांकडून

दुर्लक्षील्या गेलेली एक साधी, कमी खर्चिक बाब मला आपल्यासमोर मांडायची आहे.”आता श्रोत्यांची उत्सुकता चाळवली गेली.

समीर पुढे बोलू लागला.”ती म्हणजे या सर्वांनी उपाय शोधतांना त्यामागचे कारण पूर्णपणे दुर्लक्षिले आहे. अशी कोणती कारणे आहेत की समाजातील सर्व घटक विवक्षीत ठिकाणी, त्यांची इच्छा असो वा नसो येतात किंवा त्यांना यावे लागते आणि जामचा हिस्सा बनावे लागते? अगदी याच मुद्द्यावर मी आणि माझ्या टीमने ट्रॅफीक जाममधे जाऊन, वेगवेगळ्या भागात फिरुन, जवळपास दहा हजार लोकांना मुख्य करून हाच प्रश्न विचारला की तुम्ही या वेळी इथे का आला आहात? जी काही नानाविध उत्तरे आम्ही गोळा केली त्यावरून एकच गोष्ट समोर आली की केवळ संदेशाची देवाणघेवाण करणारी खात्रीची व्यवस्था नसल्याने त्यांना यावेळी येथे यावे लागले. रिपोर्ट देणारे घेणारे, महत्वाची कागदपत्रे केवळ फोन लागत नसल्याने बाय हॅंड देणे भाग पडल्याने यांची संख्या लक्षणीय म्हणजे सत्तर टक्के आहे. सर्व्हेच्या संबधीत फॉर्म कोणीही बघू शकतात. याचा अर्थ एवढाच होतो की बंगलादेश टेलीफोन निगम यांची कार्यपद्धती तर परिणामकारकरित्या सुधारली तर ट्रॅफीक जाम कमीत कमी पन्नास टक्के कमी होऊ शकतो. अर्थात याची इतरही कारणे आहेतच उदाहरणार्थ सायकल रिक्षा. त्यांची संख्या टप्प्याटप्प्याने कमी करणे वगैरे जी माझ्या रिपोर्टमधे नमूद केले आहेत पण मुख्य कारण मी तुमच्यासमोर मांडले आहे. हे कसे करायचे याकरिता बंगलादेशकडे पुरेसे मनुष्यबळ आणि बुद्धिबळ नक्कीच आहे.” असे म्हणून समीरने एक नाटकीय पॉज घेतला आणि डिस्प्लेबोर्डवर ५०% आकडा झळकला.

क्षणभर सभागृहात निःशब्द शांतता पसरली. हा मुद्दा फारच परिणामकारक ठरला, कारण उपस्थितापैकी प्रत्येकजणच या अनुभवातून गेला होता. प्रथम भानावर आले ते तारीक हसन. त्यांनी सर्वप्रथम टाळ्या वाजवल्या आणि सर्व उपस्थित उत्स्फूर्तपणे टाळ्या वाजवीत उभे राहिले.

----------*----------

# प्रकरण १०

त्यानंतर आभार प्रदर्शन वगैरे औपचारीकता पार पडल्यावर त्याच हॉटेलमधे जेवणाची सोय केली होती. तारीक हसन काही जेवणाकरिता थांबणार नव्हते पण ते काही परिचिताशी बोलत होते. ते जाईपर्यंत प्रोटोकोल प्रमाणे आय. जी पण जाऊ शकत नव्हते. समीरला तर त्यांनी भाषण संपल्यापासून सोडले नव्हते. आलेल्या प्रत्येक मोठ्या व्यक्तीशी ते त्याची ओळख करून देत आणि तारीफ करत.

“हे रहमत अली. हमीर ग्रुपचे संचालक आणि हा समीर याची वेगळी ओळख करून द्यायची गरज नाहीच.”

“एकदम बरोबर बोलला आपण. समीर तुझा अजून किती दिवस मुकाम आहे.”

“अजून आठ दिवस नक्कीच समजा कारण आताच्या प्रस्तावावर आपल्या टेलीफोन विभागात काय काय करता येईल हे त्याच्याकडून माहिती केल्याशिवाय मी त्याला सोडणारच नाही.” तारीक हसनने परस्पर उत्तर दिले.

“हे तर फारच छान झाले. समीर तू एक दिवस माझ्याकरता राखून ठेव.” रहमत अली म्हणाले.

तेवढ्यात तारीक हसनचा पी ए आला आणि त्यांना काहीतरी म्हणाला. त्याबरोबर ते घाईने सर्वांचा निरोप घेऊन गेले. मागील आठ दिवस केलेले श्रम,

खाण्यापिण्याकडे केलेले दुर्लक्ष, सर्व्हेकरीता भर उन्हात केलेली पायपीट याचा एकत्रीत परिणाम समीरला आता जाणवू लागला होता. हातपाय जड वाटत होते. डोळयांची आग होत होती आणि केंव्हाही भोवळ येईल असे त्याला वाटत होते. त्याच्या या अशा अवस्थेतच आय. जी आणि कबीर त्याच्याजवळ आले. दोघांनीही असा शेवट अपेक्षीला नव्हता. त्यांना समीरचे फारच कौतुक वाटत होते.

मी आय. जी अन्वर हुसेन आणि हे एस. पी. कबीर. 'फारच छान. समीर, तुझ्यामुळे आम्हाला बरीच नवीन माहिती मिळाली' असे म्हणत त्यांनी हात पुढे केला. समीरने कसाबसा हस्तोलंदनासाठी हात पुढे केला आणि तो जागीच कोसळला.

समीर कोसळत आहे हे बघताच व्यावसायीक सफाईने कबीर पुढे सरसावला आणि समीर जमीनीवर पडायच्या आत त्याने त्याला अलगद वरचेवर धरले. हुसेनने तेवढ्यात त्यांच्या दोन जवानांना खूण करून बोलावले. ते येताच त्यांनी समीरला दोन्ही बाजूने आधार देत सफाईने बाहेर असलेल्या कारमधे बसवले. हुसेनने कबीरला ताबडतोब सिटी हॉस्पिटलला जाण्यास सांगितले. समीरला अॅडमीट करून तेथेच थांबण्यास आणि गरज पडल्यास केंव्हाही संपर्क साधण्यास बजावले. त्याप्रमाणे कबीर समीरला घेऊन गेला.

हे सर्व इतक्या सफाईने झाले की उपस्थितांपैकी कोणालाही कसलीही शंका आली नाही. त्यानंतर दहा पंधरा मिनिटांनी हुसेन गेले. सावधगिरी म्हणून जाण्याआधी त्यांनी सिटी हॉस्पिटलला फोन करून समीरवर तातडीने उपचार करण्यास सांगितले. त्यांच्या सांगण्यामुळे आणि कबीरच्या उपस्थितीमुळे

असेल कदाचित समीरवर उपचार तातडीने सुरू झाले. सर्व चाचण्या आणि रिपोर्टस यायला तरी पण दहा वाजले. शेवटी व्ही. आय. पी रुममधे समीरची सोय झाली.

“आता त्याला गाढ झोप लागेल. तुम्ही गेलातरी चालेल. नर्स लक्ष ठेवेल अर्थात थांबला तरी चालेल.” उपचार करणारा तरुण डॉक्टर म्हणाला.

कबीरने क्षणभर विचार केला. एक नजर रुमवर टाकली. रूम चांगली प्रशस्त होती. कोच होता, खाण्यापिण्याची सोय होती. अजून काय पाहिजे? शिवाय समीरपण सकाळपर्यंत काही उठणार नाही. तेव्हा घरी जाऊन बायकोची बोलणी खाण्यापेक्षा इथेच झोपावे असा विचार करून तो डॉक्टरला म्हणाला की मी इथे थांबणे आवश्यक आहे.

‘मग थांबा’ असे म्हणून डॉक्टर गेला. तो गेल्यानंतर कबीरने सवयीने खिडक्या दरवाजे, टॉयलेट तपासले नंतर त्यातला फोलपणा कळल्यावर स्वतःशीच हसला. रूम पहिल्या मजल्यावर होती. कॉरीडोर प्रशस्त होता. पूर्ण कॉरीडोरच्या कठड्यालगत फरशीला लागून सहा फुटापर्यंत कौलारू शेड होती. बहुतेक तळमजल्यावर पावसाचा मारा कमी करायला बांधली असावी तीसुद्धा त्याने एकदा नजरेखालून न्याहाळली. सवयीचा परिणाम दुसरे काय? नंतर तो आत गेला. दरवाजा बंद केला समीरकडे बघितले तर तो गाढ झोपला होता. जरा कौतुकानेच त्याने समीरच्या डोक्यावर थोपटले. दहा मिनिटात सभा जिंकली पठ्ठ्याने असे मनाशी म्हणत लाईट बंद केला. अर्थात नाईट लॅम्प सुरू होता. आणि कोचावर ताणून दिली. हॉस्पिटलमधील बारीकसारीक आवाज पण हळूहळू कमी होत गेले.

सिराज ठीक आठ वाजता हॉटेल इंटर कॉटिनेंटलला पोचला. रिसेप्शनवर त्याने समीरची चौकशी केली. तोवर समीरला ॲडमीट केल्याची बातमी हॉटेलपर्यंत पोचली होती. तसे रिसेप्शनीस्टने सिराजला सांगितले. सिराजने फारच वाईट चेहरा केला.

“अरेरे, फारच वाईट झाले. मी आता त्याला हॉस्पिटलला जाऊन भेटतो त्याशिवाय मला काही पर्याय दिसत नाही.” तो म्हणाला.

हे खरेपण होते म्हणजे वाईट वाटण्याचा भाग सोडून. हॉटेलच्या रुममधे दोन-तीन तास वाट बघत बसण्यापेक्षा हॉस्पिटलमधे दबा धरून बसणे सोयीस्कर होते. तसे हॉस्पिटल जवळ होते. आधीच जाऊन सर्व माहिती काढली तर रात्री दोन वाजेपर्यंत काम सहज होईल असा विचार करीत तो सिटी हॉस्पिटलच्या दिशेने निघाला. नवू वाजता तो जेंव्हा हॉस्पिटलला पोचला तेंव्हा समीरच्या चाचण्या सुरु होत्या. समीर कोणत्या वार्डात आणि खोलीत आहे हे शोधायला त्याला काही विशेष परिश्रम करावे लागले नाही. साधारणपणे साडेनऊ वाजता तो समीरच्या रुमखाली उभा होता. व्ही. आय. पी. एरिया असल्याने वर्दळ कमी होती. कौलारू शेड रिकामीच होती. शेडच्या छपरावरुन समीरच्या रुममधे प्रवेश करणे आणि काम झाल्यावर सरळ मेन गेटमधून निघून जाणे फारच सोयीचे होते. फक्त शेडच्या छपरावर जाण्यासाठी शिडीची गरज होती. त्याचे नशिब तसे जोरावर होते. एक शिडीपण त्याला भिंतीलगत ठेवलेली सापडली. बहुधा कौल शाकारणीसाठी लागत असावी. ती त्याने अलगद एका टोकाला, कोणाच्या नजरेस पडणार नाही अशा अंदाजाने लावून ठेवली. आता तेथून समीरची रूम फक्त दहा फुट अंतरावर होती. सर्व सुरळीत होत असल्याचे बघून तो मनोमनी

फार खुश झाला. इकडे त्याचेवेळी कबीरने खरेतर वरून शेडच्या छपराचे निरीक्षण केले होते पण सिराज शिडीच्या खटाटोपात असल्याने त्याच्या नजरेस पडला नाही.

सिराजने छपरावर चढून दबा धरून बसणे व सामसूम झाल्यावर सावज टिपणे एवढाच एककलमी कार्यक्रम ठरविला होता. त्यातील दबा धरून बसणे इथपर्यंत त्याची प्रगती झाली होती आणि यावर तो खुश होता. आता फक्त दोन वाजता उठणे आणि शेवटचा भाग पूर्ण करणे एवढेच उरले होते. तसे झोपेवर त्याचे हुकमी नियंत्रण असल्याने त्याने कठड्याच्या आधाराने, कोणालाही दिसणार नाही अशा पद्धतिने सावधपणे डुलकी घेणे पसंत केले.

इकडे कबीरने पण सर्व ठीक आहे असे बघून कोचावर ताणून दिली होती. रुमचे दार फक्त लोटले होते. सवयीचा परिणाम म्हणून त्याने त्याचे लोडेड रिव्हॉल्व्हर हाताला लागेल अशा अंतरावर ठेवले होते.

बरोबर दोन वाजता सिराज खडबडून जागा झाला. त्याने घड्याळ बघितले आणि त्याला समाधान वाटले. बस अजून दहा मिनिटे फक्त असे स्वतःला म्हणत तो उभा राहिला आणि समीरच्या रूमकडे जाऊ लागला. पहिले पाऊल टाकताच त्याच्या पायाखाली एक काटकी तुटून तिचा कट असा आवाज आला आवाज तसा फार मोठा नव्हता पण रात्रीच्या शांततेमुळे त्याला तो मोठा वाटला. आता समीरच्या रुमपर्यंत जर असाच आवाज येऊ लागला तर एखाद्याचे लक्ष गेले असते. ही जागा निवडण्यात आपली जरा चूकच झाली असे त्याला वाटले. पण आता काही उपयोग नव्हता. तसेही हा भाग जरा आडबाजूला असल्याने त्याने धोका पत्करायचे ठरविले आणि दबक्या पावलाने तो हळूहळू समीरच्या

रूमकडे जाऊ लागला. चालताना तो जास्तीत जास्त काळजी घेत होता. प्रत्येक पाऊल टाकल्यावर निदान मिनिटभर थांबून, कानोसा घेत होता. त्यामुळे दहा फुटाचे अंतर पार करायला त्याला वीस मिनिटे लागली. शेवटी एकदाचा तो रुमसमोर येऊन पोचला. तसा कॉरिडारमधून उडी मारुन तो येऊ शकला असता पण आजूबाजूच्या रुममधे कोणी असल्यास त्याचा बेत फसला असता म्हणून त्याने ते टाळले.

नंतर मात्र समीरच्या रूमसमोर येईपर्यंत कसलाही आवाज न करता तो आला. आतापर्यंत तरी सर्व निर्वेध पार पडले होते आणि हा शेवटचा टप्पा पार पडला की झाले असा विचार करत तो सावकाश उभा राहिला पण आतापर्यंत त्याच्या बाजूने असणारे नशीब आता फिरले होते कारण तो जेंव्हा पूर्ण उभा राहिला तेंव्हा त्याने आपल्या समोर कबीरला हातात रिव्हॉल्व्हर घेऊन उभा असलेला बघितला.

त्याचे असे झाले होते की जो काही सिराजच्या पावलांचा आवाज होत होता तो त्याला जरी कमी वाटत होता तरी कबीरसारख्या अतिशय सावध झोपेच्या माणसाची झोप चाळवण्यासाठी पुरेसा होता. ठराविक अंतराने होणारा आवाज म्हणजे कोणीतरी येत आहे हे कबीरसारख्या प्रशिक्षीत व्यक्तीला सांगण्याची गरज नव्हती. त्यानेपण अजिबात हालचाल न करता प्रथम समीरकडे बघितले. तो शांत झोपला आहे हे लक्षात येताच तो आवाज न करता उठला व कॉरिडॉरच्या एका पिलरमागे लपला आणि सिराज उभा राहताच त्याच्या पुढे ठाकला.

दोघांचीही जेव्हा नजरानजर झाली तेव्हा दोघांनीही एकमेकांना ताबडतोब ओळखले. पाच वर्षापूर्वी आपल्या हातून निसटलेला सिराज समोर बघताच कबीरचा संताप अनावर झाला. त्याने क्षणात गोळी झाडली. इतक्या जवळून नेम चुकणे अशक्य होते. सिराजने उभ्याउभ्याच दोन्ही हात वर केले आणि दुसऱ्याच क्षणी त्याचे निष्प्राण कलेवर कौलावरून गडगडत खाली कोसळले. गोळीच्या आवाजाने आजूबाजूच्या रुममधील लोक जागे होतील, बाहेर येतील असे कबीरला वाटले होते पण तसे काही झाले नाही कारण यावेळेस नशीब कबीरच्या बाजूने होते. कबीरने गोळी झाडायला आणि एक अँबुलन्स सायरन वाजवीत हॉस्पिटलमधे यायला एकच गाठ पडली त्यामुळे गोळीचा आवाज दबल्या गेला. जाणवला नाही. उलट सिराज खाली पडल्यावर झालेल्या आवाजाने खाली पहाऱ्यावर असलेले दोन पोलीस धावत आले आणि वर बघू लागले.

तोवर कबीर रुममधे गेला होता. त्याला जरा आश्चर्याचा धक्का बसला कारण क्षीण आवाजात समीर पाणी मागत होता. त्याला पाणी दिल्यावर समीरने काय झाले असे विचारले.

“कोणी नाही. पेशंटचे नातेवाईक होते. वार्ड चुकले होते.”

“मग?”

“योग्य वार्ड शोधून दिला. तू लक्ष देऊ नको. आराम कर.”

समीरचे समाधान झाले असावे किंवा त्राण संपले असावे. तो लगेच झोपी गेला.

इकडे कबीरपण विचारात पडला. सिराज भाडोत्री मारेकरी आहे हे त्याला ठाऊक होते पण समीरला मारण्याची सुपारी सिराजला कोणी व का दिली असावी?

सुटकेचा एक सुस्कारा टाकून कबीर दार बंद करण्यासाठी गेला तोच खालचा पोलीस धावत आला आणि विचार

लागला" तुम्हाला इथून कोणी जातांना दिसले काय?"

"नाही." व्हरांडयात येत कबीर म्हणाला. कबीर व्हरांड्यात आल्यावर पोलीसाने त्याला ओळखले आणि कडक सॅल्यूट ठोकला.

"सर, एक डेड बॉडी छपरावरून आत्ताच खाली पडली."

'चल बघू' असे कबीर म्हणाला आणि दोघेही खाली आले. त्या पोलीसाजवळ टॉर्च पण होता. बॉडीपाशी झाल्यावर त्याने टॉर्चच्या प्रकाशात कबीरला बॉडी दाखविली.

कबीरने तो चेहरा प्रथमच बघितल्यासारखे दर्शविले आणि त्या पोलीसाला विचारले," तुझे नाव?"

"सब इंस्पेक्टर अहमद खाकी सर."

"हा कोण तुला माहिती आहे?"

"नाही सर."

"सिराज, शार्प शुटर."

ते नाव ऐकताच अहमद गार झाला. कसेबसे धाडस करून त्याने विचारले

"पण हा इथे कसा आला आणि त्याला कोणी मारले असेल."

थोडासा विचार करून कबीर म्हणाला,''तो कोणालातरी ठार मारायलाच आला असेल पण तो पळून जात असता तू त्याला एका गोळीत ठार केले.''

“मी?”

“होय, इंस्पेक्टर अहमद.”

“सब इंस्पेक्टर सर.”

“मी बरोबरच म्हणालो. तुला जर मान्य असेल तर पटकन कामाला सुरुवात कर. नसेल तर तसे सांग आणि तुझ्या साथीदाराला माझ्या कडे पाठव.”

“सर, आपण तर उगीच नाराज होत आहात. मी तयार आहे फक्त मला एवढेच सांगा की हा सेहरा तुम्ही माझ्या डोक्याला का बांधता?”

“कारण माझ्या डोक्यावर जागा नाही.”

झाले. अहमद कामाला लागला आणि कबीर परत कोचावर येऊन झोपला. झोपण्याआधी त्याने घड्याळ बघितले. रात्रीचे तीन वाजले होते.

सकाळी सात वाजता कबीर जागा झाला. त्याला अतिशय उत्साही आणि ताजेतवाने वाटत होते. समीर अजूनही शांत झोपला होता. तयार होऊन कबीर बाहेर आला तेव्हा त्याला दारावर एक पोलीस पहारा देतांना दिसला. अहमदने काम व्यवस्थित पार पाडले असे दिसते असे कबीर मनाशी म्हणाला.

"अहमद कुठे आहे?”

“साब दो बार आये थे लेकीन आप सोये थे.”तो म्हणाला

दोनच काय तो दोनशे वेळा येईल असा विचार कबीर करत असतांना अहमद पळत आला. तो येताच कबीरने विचारले,” झाले काम.”

“हो सर. हा रिपोर्ट.”

एक वरवर नजर टाकून कबीरने रिमार्क लिहिला आणि अहमदला पेपर परत केला.

“आता हा रिपोर्ट तुझ्या साहेबाला दे आणि निश्चिंत रहा. इथला पहारा चालू ठेव. कोणालाही आत सोडू नको.”

असे म्हणून तो आय. जीला भेटण्यासाठी निघाला. जातांना त्याने डेली इत्तेफाक घेतला आणि चाळला. अपेक्षेप्रमाणे समीरचे सेमिनारमधील भाषणाचा वृत्तांत मुखपृष्ठावर छापला होता. आमचे प्रश्न सोडवतांना बिचारा हिन्दुस्थानी अतिश्रमानी आजारी पडला अशी मिश्किल टिप्पणी पण केली होती. पण कबीर शोधत होता ती बातमी त्याला पाचव्या पानावर एका छोट्या कॉलममधे सापडली. पोलीसांशी झालेल्या चकमकीत एक अज्ञात गुंड सिटी हॉस्पिटल एरियात मारल्या गेला. पोलीस तपास चालू आहे एवढीच त्रोटक बातमी होती. समाधानाने कबीरने पेपरची घडी केली. कोणी कितीही प्रयत्न केला तरी या बातमीचा आणि आपला काही संबंध लावू शकणार नाही याची त्याला खात्री वाटली फक्त एक माणूस सोडून, तो म्हणजे स्वतः आय. जी!

----------*----------

# प्रकरण ११

एका तासानंतर जेंव्हा कबीर आय. जीसमोर बसला होता तेंव्हा त्यांच्यासमोर अहमदचा रिपोर्ट होता. काहीश्या नाराजीनेच त्यांची कबीरकडे बघितले.

“तू त्याला पकडूपण शकला असता.”

“कोणाला?”

“उगाच ॲक्टींग करू नकोस. तुला माहिती आहे मी कोणाबद्दल बोलत आहे. कोण होता तो?”

‘कावळा’ कबीर मनात म्हणाला. याला सर्व धागेदोरे कसे जोडावे हे छान जमते. पण उघडपणे 'सिराज' एवढेच म्हणाला.”शार्प शूटर, शकील गॅंग, सध्या भाडोत्री मारेकरी.” आणि काही सेकंद थांबून ‘होता’ अशी पुस्ती जोडली.

‘तो तिथे का आला होता? तुला मारायला?”

“तेच मला कळत नाही. मला मारण्यासाठी त्याला कोणी पैसे देणार नाही आणि समीरचा यात संबंध नाही.” आय. जी पण विचारात पडले.

“समीरला विचारून बघितले? कदाचित त्याच्या सर्व्हेमुळे कोणाचे नुकसान होत असेल.”

“मला तशी शक्यता वाटत नाही. सध्या तो गुंगीत आहे. जागा झाल्यावर विचारेन. त्याचा काही संबंध असेल असे मलातरी वाटत नाही.”

“वाटत तर मलाही नाही पण त्याने नकळत कोणाच्या शेपटावर पाय दिला असेल तर?”

“ठीक आहे.”

“मात्र चोवीस तास त्याच्यावर लक्ष ठेव.”

“यस सर.”

परत सिटी हॉस्पिटलला आल्यावर समीरची तब्येत कशी आहे, किती दिवशात डिस्चार्ज मिळेल याची डॉक्टरांकडे चौकशी केली. काळजीचे काही कारण नाही. दोन दिवसात तो ठीक होईल हे कळल्यावर त्याला जरा बरे वाटले. नंतर तो समीरच्या रुमवर आला. समीर अजूनही झोपला होता. तेवढ्यात दार उघडून सुलेखा आत आली. आतमधे कबीरला बघून तिने प्रश्नार्थक चेहरा केला. ‘सुरक्षेसाठी’कबीर एवढेच म्हणाला. सुलेखा काही बोलणार तोच समीर क्षीण आवाजात पाणी मागू लागला. सुलेखाने त्याला पाणी दिले. पाणी प्याल्यावर त्याला जरा हुशारी आली आणि त्याने

विचारले,”तू इथे कशी?”

“मी इथेच काम करते. तुला सांगितले होते.”

“अरे हो. मी विसरलो होतो.”

या संभाषणावरून यांची आधीची ओळख असावी हे कबीरने ताडले पण तो काही बोलला नाही. ताप, बी पी चेक करून नोंदी करून सुलेखाने समीरला औषधे दिली. आराम करण्यास बजावले. उद्या येईन असे सांगून ती गेली. कबीरसारख्या मुरलेल्या अधिकाऱ्याला सुलेखा समीरची कोण असावी असे

सांगण्याची गरज नव्हती तरी पण समीर जरा रिलॅक्स होऊन बसल्यावर त्याने सहज विचारल्यासारखे सुरुवात केली.

“समीर, तुला आता कसे काय वाटत आहे.”

“एकदम फ्रेश. बहुधा पूर्ण विश्रांती झाल्याने असेल.”

“ठीक आहे. तसे असेल तर तुला काही प्रश्न विचारू?”

“विचारा.”

“तुला येथे येऊन किती दिवस झाले?”

“चौदा.”

“या दरम्यान सर्व्हेशिवाय तू कोणाला भेटला किंवा तुला कोणी भेटले काय? हॉटेलचा स्टाफ, सेमिनारचे आयोजक सोडून.”

“नाही.”

“कोणाशी वाद, भांडण, मतभेद?”

“अजिबात नाही.”

“एक एक दिवस आठवून बघ. अगदी किरकोळ घटना असली तरी आठव.”

समीर जरा विचारात पडला.

“तुम्ही हे सर्व का विचारता?”

“कारण काल रात्री तुला ठार मारण्याचा प्रयत्न झाला.”

“मला मारण्याचा प्रयत्न करावा एवढा काही मी महत्त्वाचा नाही. सर्व्हेत तरी काही स्फोटक नव्हते.”

“म्हणूनच म्हणतो त्याच्याव्यतिरिक्त एखादी वेगळी, किरकोळ बाब, व्यक्तीशी संपर्क जे तुला अगदी किरकोळ वाटत असेल पण त्याच्या दृष्टीने मोठी बाब असेल.”

“मला मारण्याइतपत?”

“होय. म्हणून एक एक दिवस आठव.”

“ठीक आहे. मी एक एक दिवस सांगतो. तुम्ही नोट करा.”

मग समीरने आपल्या बुद्धिमत्तेची चुणूक कबीरला दाखविली. त्याने पहिल्या दिवसापासूनचा दिनक्रम कबीरला केवळ कुशाग्र स्मरणशक्तिच्या जोरावर सांगितला. कबीर विस्मयाने फक्त महत्वाचे वाटेल ते लिहीत होता. पंधरा दिवस तर अगदी एकसारखे म्हणावे असे होते. फक्त सुलेखा आणि सकिनाची भेट झाली तो दिवस थोडा वेगळा होता.

आता सोळावा म्हणजे कालचा सेमिनारचा दिवस. समीर म्हणाला,” हा मात्र बराचसा वेगळा होता.”

“म्हणजे?” आणि कबीर सरसावून बसला.

मग समीरने शहीद स्मारकला दिलेली भेट, इरफानची भेट, डेली इत्तेफाकचा अंक असून त्याने नाही सांगणे हा तपशील कबीरला सांगितला.

“नंतर सेमिनार आणि तेथे काय झाले हे तुम्हाला माहित आहे.”

कबीर उत्तेजित स्वरात म्हणाला,”मला वाटते की चित्र बरेचसे स्पष्ट होत आहे. अजून एक प्रश्न.

“आता काय?”

“या सर्व व्यापातून हे सुलेखा प्रकरण करायला तुला कसा वेळ मिळाला?”

“हिन्दुस्थान नेहमीच बंगलादेशाला मदत करतो.” समीर उसन्या गांभिर्याने म्हणाला.

आणि दोघेही जोरात हसले.

“तिच्याजवळ जतीनचे काही डॉक्युमेंट्स असले तर मला द्यायला सांग. कदाचीत त्यावरून लवकर तपास करता येईल.” कबीरने समीरला सांगितले. त्यानेपण होकार दिला. थोडा विचार करून कबीरने स्वतःचे रिव्हॉल्व्हर काढले आणि समीरला देत म्हणाला,” हे जवळ असू दे. स्वसंरक्षणासाठी.”

ते हातानीच दूर सारत समीर म्हणाला,” नको. मला याची गरज वाटत नाही.”

“समीर, तू कोणाशी पंगा घेतला आहेस तुला कल्पना नाही. तू नुसताच संकटात नाही महासंकटात आहेस. अशा वेळी निःशस्त्र असणे घातक ठरू शकेल. शिवाय तुझे काही प्रशिक्षणपण झालेले नाही.”

“कदाचित तीच माझी ताकद असेल.”

यावर निरुपाय झाल्याने कबीरने वाद थांबवला आणि जाण्यासाठी उठला तोच समीर त्याला म्हणाला,” तुमचे प्रश्न संपले असतील तर मी काही व्यक्तिगत प्रश्न विचारू काय? अर्थात तुम्हाला वेळ असला तर.”

“जरुर विचार.” कबीर परत बसत म्हणाला.

“तुमच्या घरी कोण कोण आहेत?”

कबीर चमकलाच. बऱ्याच वर्षांनी त्याला कोणीतरी असा प्रश्न विचारत होते. नेहमी प्रश्न विचारायचे काम केल्याने त्याची उत्तर द्यायची सवय मोडली होती.

“मी आणि माझी पत्नी.”

“आणि?”

“माझी मुलगी डॉक्टर आहे. अमेरिकेला असते.”

“तुमच्याकडे बघून असे वाटत नाही की तुम्हाला एवढी मोठी मुलगी असेल.”

नकळत कबीर हसला,” त्याचे असे आहे समीर, माझे लग्न लवकर झाले साहजिकच मुलेपण लवकर झाली.”

समीरला पण हसू आले.” मग मुलीला काही भाऊ, बहीण?”

“समीर!”

“ठीक आहे, ठीक आहे पण मुलीकडे तर जात असाल ना?”

“नाही.”

आता समीर चमकला.

“फार व्यक्तिगत नसेल तर कारण कळू शकेल?”

किंचित अस्वस्थ होत कबीर म्हणाला,” तिने आमचा विरोध पत्करून एका ख्रिश्चन डॉक्टरशी लग्न केले.”

“त्यांचे प्रेम असेल.”

“तो तिचा क्लासमेट होता.”

“मग त्यात काय झाले. ती सुखात आहे ना?”

“असेल. माझा संपर्क नाही.”

“तिचा असेल ना?”

“माझ्याशी नाही. पत्नीशी असेल.”

“असेल नाही, आहे आणि त्या तुम्हालापण सर्व सांगतात. तुम्हीपण वरकरणी निरुत्साह दाखवीत उत्सुकतेने ऐकता. खरे ना?”

“तुला कसे ठाऊक?”

“बापलेकीची माया वेगळीच असते. तुम्ही स्वतः एक फोन करा आणि ही कृत्रिम दुरी मिटवा.”

“ती बोलेल?” कबीरने नकळत विचारले.

“मी खात्रीने सांगतो ती तुमच्या फोनची वाट बघत असेल.”

कबीरने आश्चर्याने समीरकडे बघितले पण काही बोलला नाही. बऱ्याच दिवसांनी कोणाजवळ या सलणाऱ्या विषयावर बोलल्यामुळे त्याला मोकळे वाटत होते.

दुसऱ्या दिवशी सकाळी दहाच्या सुमारास शहीद स्मारक समोर कबीर उभा होता. वाचनालय उघडताच तो आत गेला. एका तरुण ग्रंथपालाने त्याचे स्वागत केले.

“मी आपली काय मदत करू शकतो?” त्याने नम्रपणे विचारले.

“इथे नेहमी जे ग्रंथपाल असतात त्यांना मला भेटायचे आहे.”

“माफ करा. पण त्यांचा मृत्यु झाला आहे.”

“काय म्हणता? केव्हा?”

“काल रात्री.”

“कशानी? परवा तर ते कामावर होते.”

सांगावे की नाही या संभ्रमात तो तरुण पडला.

“आपण कोण?”

काही न बोलता कबीरने ओळखपत्र दाखविले. ते बघताच तो म्हणाला,” त्यांनी आत्महत्या केली.”

“पत्ता मिळेल?”

पत्ता जवळचा होता. कबीर तातडीने तिथे गेला. पोलीसांचे सोपस्कार सुरु होते. कबीरने इरफानच्या पत्नीची भेट घेतली. ती अतिशय शोकमग्न होती तरी पण कबीरला भेटली. काय कशामुळे इरफानने आत्महत्या केली असेल यावर तिच्याकडे काही उत्तर नव्हते. आपसात भांडण, कर्ज काही नव्हते.

कबीरला फक्त एक गोष्ट खटकली. इरफानचे राहणीमान उत्पन्नापेक्षा फारच वरच्या दर्जाचे होते.

हॉस्पिटलकडे येतांना कबीरला झालेला घटनाक्रम परत एकदा आठवू लागला. सर्व गोष्टी समोर आहेत पण आपल्याला त्यांची नीट सांगड घालता येत नाही असे त्याला वाटू लागले. या सर्व घटनाक्रमाशी समीरचा काय संबंध येतो याबद्दलही त्याला जरा शंका येऊ लागली. आपणच जास्त विचार करून समीरचा याच्याशी संबंध जोडत आहो असे त्याला वाटू लागले. असा विचार

करतच तो समीरच्या रुममधे पोचला. दार लोटून आत शिरताच त्याला समीर आणि सुलेखा एकमेकाच्या बाहुपाशात दिसले.

“सॉरी. मी चुकीच्या वेळी आलो असे मला वाटते.”

सुलेखा पटकन समीरपासून दूर झाली. लाजून म्हणाली,”काही नाही. त्याच्या डोळयांत कचरा गेला तो काढत होती.” अगदी चकाचक असलेल्या रुमवर एक नजर टाकून कबीर म्हणाला,” हो खरच इथे फारच कचरा आहे. बर ते जाऊ दे. जतीनची काही वस्तु मिळाली?”

एक डायरी कबीरला देत ती म्हणाली,” ही डायरी भैया फार जपायचे. ती फक्त मिळाली. त्यात फक्त काही नंबर आणि पत्ते आहेत.”

बघू म्हणत कबीरने ती डायरी घेतली व चाळली. त्यातील नंबर आणि आकड्यावरून काही बोध होईना. ती समीरता देत तो म्हणाला,” बघ, तुला काही कळते काय.” समीरने ते नंबर नीट वाचले. दहा बारा मिनिटांनी तो म्हणाला,

“हे जे डिटेल आहेत ते कंसाइनमेन्ट नंबर आणि तारखा असाव्यात असे वाटते. बाजूच्या पत्त्यावर हे कंसाइनमेंट येत असावे. कसले आहेत ते प्रत्यक्ष चेक केल्यावरच कळेल. जर रुटीन बाब असती तर अशी वेगळी नोंद करायची गरज नव्हती म्हणून मला वाटते की बहुतेक हा सर्व व्यवहार अवैध असावा.”

आता कबीरने पुन्हा निरीक्षण केले आणि त्याला समीरचे म्हणणे पटले. तो समीरला म्हणाला,

“तू म्हणतो त्यात तथ्य वाटते. मी उद्या यावर कारवाई करेन.”

समीर शांतपणे हसून एवढेच म्हणाला," का? आज काही वाईट दिवस आहे का?" कबीरची त्यावरची प्रतिक्रिया ताबडतोब निघायची होती. फक्त जातांना त्याने समीरला तो आल्याशिवाय डिस्चार्ज घेऊ नको असे बजावले आणि कोणत्याही परिस्थितीत अनोळखी माणसाबरोबर जाऊ नकोस असे बजावले. हेच त्याने पहारा देत असलेल्या पोलिसाला पण सांगितले.

काहीसा निश्चिंत होत कबीरने आय. जीची भेट घेतली. झालेल्या घडामोडींची पूर्ण माहिती देऊन त्याने डायरी त्यांना दाखविली आणि जे काही वीस पत्ते होते त्याठिकाणी धाडी टाकण्याची परवानगी घेतली. आय. जीचेही मत अनुकूल पडल्याने त्याचा उत्साह वाढला. सर्व जय्यत तयारी झाल्यावर त्याने वीसही ठिकाणी एकदम धाड़ी टाकल्या आणि बंगलादेशच्या इतिहासातल्या सर्वात मोठा ड्रगजचा साठा जप्त झाला. हे इतके अनपेक्षीत झाले की त्यात

गुंतलेल्या लोकांना कसलीही हालचाल करायची संधीपण मिळाली नाही. अशा चाळीस लोकांना अटक केल्यावर आणि रीतसर कारवाई करेपर्यंत रात्रीचे नऊ वाजले. त्यानंतर उर्वरीत कामे आपल्या सहकाऱ्यांवर सोपवून कबीर लगबगीने रात्री अकराच्या दरम्यान समीरला भेटायला आला. त्याला रुम रिकामी बघून आश्चर्याचा धक्का बसला. एक नर्स आली आणि बेडशीट बदलू लागली.

"समीर कुठे आहे?"

"त्यांना सात वाजताच डिस्चार्ज मिळाला."

"कुठे गेला काही कल्पना?"

“नाही.”

कबीर तसाच उलटपावली रिसेप्शन काऊंटरला गेला. नशिबाने अहमद ड्यूटीवर होता.

“तुला मी समीरला एकटा जाऊ देऊ नको म्हणून बजावले होते ना?” कबीर ओरडून म्हणाला.

“होय. पण हमीर ग्रुपचे मालक रहमतअली आले होते.”

कबीरच्या डोक्यावर जणू काही कोणी गार पाण्याची बादली ओतली कारण जमना फार्मा ही हमीर ग्रुपची कंपनी होती आणि आजचे छापे जमना फार्मावर पर्यायाने हमीर ग्रुपवर पडले होते. कदाचित हे सर्व कळल्यानेच रहमतने समीरला ताब्यात घेतले असावे.

“त्यांनी स्वत:च्या जबाबदारीवर त्याला नेले. उद्या संध्याकाळी हॉटेलवर सोडेन आणि तुम्हालापण कळवतो असे म्हणाले. मग मी तरी काय करणार! त्यांनी हमी दिल्याने डॉक्टरांनी पण संमती दिली.”

“कुठे जातो काही म्हणाले का?”

“पहाडगंजच्या फार्मवर जातो असे म्हणाले.”

“मी पाच मिनिटात आलोच.” तिथून कबीर तसाच पळत सुलेखाकडे गेला. कोणत्याही परिस्थितीत क्वार्टर सोडायचे नाही. मी स्वतः आल्याशिवाय कोणाबरोबरही जायचे नाही. कोणत्याही निरोपावर विश्वास ठेवू नकोस. असे बजावून, तिच्या विनंत्याकडे साफ दुर्लक्ष करीत तो परत रिसेप्शन काऊंटरवर आला. गाडी व अजून दोन पोलीस घेऊन पहाडगंजच्या दिशेने निघाला. गाडीत बसताच त्याने ड्रायव्हरला सांगितले,”रहमत अलीचे पहाडगंज फार्म हाउस.”

----------*----------

# प्रकरण १२

समीर रहमत अलीबरोबर नऊ वाजताच फार्महाऊसला पोचला होता. रहमत अलीचे एकंदर व्यक्तीमत्व जरी रुबाबदार असले तरी खरा प्रभाव त्याचा जाड खर्जातील आवाजाचा पडत असल्याचे त्याचे मत झाले. त्याला त्यांची आदब आणि सौजन्य जरा अतीच वाटले. अगदी हीच भावना त्याला ग्रंथपाल इरफानशी बोलतांना पण वाटली होती रहमत अलीचा मुख्य उद्देश बहुधा टेलीकॉमशी संबंधीत उद्योग सुरू करणे असावा हा त्याचा एक कयास होता. तसे अधूनमधून सूचक बोलणे ते करत होते.

फार्महाऊसला पोचल्यावर मात्र त्यांनी आता तू थकला असशील, आधी जेव, आराम कर नंतर उद्या सकाळी बोलू असे जवळपास फर्मान सोडले. समीरला थोडा थकवा जाणवत होता. त्यामुळे त्याने होकार दिला. एका प्रशस्त रूममधे त्याला त्यांनी स्वतः नेले. निवांत झोप. सकाळी भेटू असे म्हणून ते गेले. भरपूर जेवण झाल्याने आणि औषधाच्या प्रभावाने समीर लगेच झोपला. दोनच तासांनी त्याला खडबडून जाग आली व तो उठला. तो घामाने ओलाचिंब झाला होता. त्याचे कारण होते ते इतके वर्ष त्याच्या अंर्तमनात सुप्त होऊन दडलेले ते स्वप्न! ते परत उसळी घेऊन वर आले होते. त्याला दिसले ते लष्करी गणवेषात एकमेकाशी हुज्जत घालत असलेले दोन अधिकारी. त्यातील एकाने संतापाच्या भरात दुसऱ्याच्या खांद्यावरील बॅज हिसका देऊन तोडला आणि ताबडतोब निघून जाण्याची आज्ञा दिली. पण दुसऱ्याने रिव्हॉल्व्हर काढून गोळी झाडली. पहिल्या अधिकाऱ्याने मुठीत दोन चांदतारे असलेला बॅज वर धरत दुसऱ्या

हाताने गोळी झाडली पण कोसळत असतांना गोळी झाडल्याने ती पहिल्या अधिकाऱ्याच्या पायात घुसली.

तेवढ्यात एकजण धावत आला व त्याने पहिल्या अधिकाऱ्याला अलगद धरून जीपमधे बसवले व जीप जोरात

पळवली. त्याच क्षणी त्याला जाग आली. तो घामाने ओला झाला होता. तिथेच असलेले पाणी तो प्याला. इतक्या वर्षांनी अचानक पडलेल्या स्वप्नाने तो भांबावून गेला होता. जवळच असलेल्या वार्डरोबकडे त्याचे लक्ष गेले. निदान शर्टतरी बदलू या विचाराने त्याने वार्डरोब उघडला. आत विविध प्रकारचे ड्रेस हारीने लावले होते. त्यामधे झब्बे, अचकन, टी शर्ट्स, बुश शर्टस असे अनेक प्रकार होते. एक एक हँगर बाजूला करत समीरला सर्वात टोकाला एक लष्करी गणवेषपण व्यवस्थित इस्त्री करून टांगलेला दिसला. थरथरत्या हातांनी त्याने त्या हँगरवरील शर्ट काढला व डोळयासमोर धरला. त्या शर्टाची डावी बॅज तुटलेली होती.

तेवढ्यात दरवाजा हळुवारपणे उघडून रहमत अली आत आला. तो किंचित लंगडत चालत होता. त्याच्या डाव्या हातात काठी होती आणि उजव्या हातात रिव्हॉल्व्हर.

"अभिनंदन. समीर. बंगलादेश गुप्तचर यंत्रणेपेक्षाही लवकर तू मला शोधून काढले." तो त्याच्या खास जाड खर्जातील आवाजात म्हणाला. समीरच्या प्रश्नार्थक चेह-याकडे बघत तो पुढे म्हणाला,"मीच अशफाक खान. फरारी युद्धगुन्हेगार. ज्याची चौकशी तू इरफानपाशी करत होता. युद्धानंतर मोठ्या प्रयासाने मी हमीर ग्रुपमधे घुसलो अर्थात तिच्या आड ड्रगचा व्यवसाय

करण्यासाठी पण तू आलास. सर्व्हेच्या निमित्ताने सर्व माहिती काढून माझे सर्व साम्राज्य उध्वस्त केलेस.''

''मी?''

''होय तुच. इथली सर्व पोलीस यंत्रणा माझ्या मुठीत होती. तो प्रभाव संपवायला बाहेरचाच माणूस पाहिजे होता. पण आता तू संपला.''

''मला यातले. काहीही माहिती नव्हते आणि याच्याशी माझा काहीही संबंध नाही.''

''मग मला का शोधत होता?''

हातातील शर्ट त्याच्यासमोर धरून समीरने विचारले,'' ११ डिसेंबर १९७१ मेघना हॉस्पिटल. काही आठवते?''

किंचित अस्वस्थ होत अशफाक म्हणाला,''त्याचे काय?''

''दोनशे नर्सेस वाचविण्याकरता एक शूर हिन्दुस्थानी अधिकारी प्रयत्न करीत असतांना एका नीच वासनांध पाकी अधिकाऱ्यानी त्याला गोळी घालून ठार मारले.''

''असेल.''

''असेल नाही असेच झाले होते. त्या अधिकाऱ्याने तुझी बॅज हिसका देऊन तोडली आणि तुला चालते होण्याची आज्ञा दिली होती. पण भेकडा, तू त्याला गोळी घातली. त्याने पण गोळी झाडली ती तुझ्या पायाला लागली. त्यामुळे तू आजपण लंगडतो आहे. खरे तर तू एकतर जमिनीवर सहा फूट वर लटकायला पाहिजे होता किंवा जमिनीखाली सहा फूट असायला पाहिजे होता.''

''तुझा काहीतरी गैरसमज होत आहे. असे काहीही माझ्या बाबतीत घडले नाही.''

खिशातील चांदतारे असलेली बॅज शर्टाच्या ओरबाडलेल्या फितीच्या भागाला लावून दाखवत समीर म्हणाला,

“हा भाग बरोबर जुळतो.”

“समीर, युद्धात अशा घटना होत असतात.”

“याला युद्धातली घटना म्हणत नाही, खून म्हणतात. तो ही तुझ्यासारख्या नीच विषयांध, भेकड माणसाने एका शूर अधिकाऱ्याचा केलेला.”

“पण तुझा यांच्याशी काय संबंध?”

“तू ज्याचा खून केला होता ते माझे वडील होते.”

हातात रिव्हॉल्व्हर असूनही अशफाक सुन्न झाला पण क्षणात सावरून म्हणाला,” मग मला तर आता कसलाही पुरावा मागे ठेवता येणार नाही.” त्याने रिव्हॉल्व्हर रोखून गोळी झाडली. अगदी याच क्षणी कबीर दारात आला आणि त्याने अशफाकच्या डोक्याचा वेध घेत गोळी झाडली.

कबीरचा नेम चुकणे अशक्यच होते. त्याच्या गोळीच्या दणक्याने अशफाकने झाडलेली गोळी समीरच्या खांद्याला चाटून गेली आणि तीव्र वेदनेने समीर खाली पडला. त्याच्याकडे पूर्ण दुर्लक्ष करीत कबीरने अशफाकच्या छातीवर, दोन गोळया झाडून त्याची तडफड थांबविली.

हे सर्व डोळे विस्फारून बघण्याऱ्या अहमदला त्याने समीरला किती लागले ते पाहण्यास सांगितले. तोवर कबीर फोन करू लागला. त्याने जवळच्या पोलीसस्टेशनला फोन करून फोर्स पाठविण्यास सांगितले. फोन ठेवल्यावर त्याने अहमदला परत विचारले.

“समीर तकदीरवाला आहे सर. गोळी चाटून गेली आहे पण जखम खोल आहे. रक्त वाहते आहे अजून.” अहमदने माहिती पुरवली.

“जरा इकडेतिकडे शोध, फर्स्ट एड बॉक्स असेल. तात्पुरते बँडेज कर.”

अहमद फर्स्ट एड बॉक्स शोधू लागला. समीर अर्धवट ग्लानीत होता. त्याला काय चालले आहे ते कळत होते पण स्वतःहून काही करू शकत नव्हता. त्याने डोळे मिटून घेतले.

“मिळाली सर.” अहमद बॉक्स घेऊन आत येतांना म्हणाला.

“चल आटप लवकर. आपल्याकडे वेळ कमी आहे.”

“झालेच सर.”

तात्पुरते बँडेज झाल्यावर रक्त वाहणे थांबले. दोघांनी मिळून समीरला गाडीत नसले कबीर परत आत गेला व आतील पोलीसाला म्हणाला,”आम्ही समीरला घेऊन सिटी हॉस्पिटलला जात आहो. पंधरा-वीस मिनिटात पोलीस येतील. त्यांना फक्त समीरचे नाव सोडून सर्व सांग. अशफाक चकमकीत मारल्या गेला एवढेच सांग. ते येईपर्यंत ही बॉडी थोडीजरी हलल्यासारखी वाटली तर बेशक गोळी झाड.”

बाहेर येऊन तो अहमदला म्हणाला,” आता सर्वात महत्वाचे काम. समीरची रवानगी. लवकर चल.”

जात असतांना समीरला मागे बसवले होते आणि कबीर आधार देत होता. रात्रीची वेळ असल्याने रस्ता मोकळा होता. गाडी सुसाट जात होती. समीर ग्लानीतच होता. त्याच्याकडे कौतुकमिश्रित नजरेने बघतांना कबीरच्या मनात हेच विचार घोळत होते की या पोरसवदा तरुणाने एक युद्धगुन्हेगार, सराईत

स्मगलर फक्त दोन आठवड्यात पकडला आणि तेही कोणतेही शस्त्र न वापरता. अगदी नशीबाची साथ असली तरी ही कामगिरी काही लहान म्हणता येणार नाही. शिवाय वागणे पण किती सौजन्यशील.

तेवढयात हॉस्पिटल आल्याने त्यांची विचारश्रृंखला तुटली. समीरला आत नेल्याबरोबर त्याने सुलेखाला बोलावले आणि थोडक्यात सर्व सांगितले. समीरवर ताबडतोब उपचार सुरू झाले. तासाभरात डॉक्टर आणि सुलेखा बाहेर येऊन कबीरला म्हणाले की आता धोका टळला आहे. तुम्ही भेटू शकता आणि जाऊ लागले.

कबीरने त्यांच्या खांद्यावर हात ठेवून त्यांना थांबवले.

"अजून बरेच काही करायचे आहे. तुमची मदत लागेल."

"मी सांगितले ना, आता धोका नाही. दोन तीन दिवसात ठीक होईल."

"होईल तेव्हा होईल पण मला आता सातच्या विमानाने त्याला हिंदुस्थानात पाठवायचे आहे. त्यासाठी काय करावे लागेल तेवढे सांगा."

"छे, छे. ते शक्य नाही."

"ते शक्य आहे की नाही, हे मी विचारले नाही. हे करावेच लागेल हे मी सांगत आहे." कबीर करड्या आवाजात म्हणाला,"प्लिज को-ऑपरेट. ही रिक्वेस्ट आहे."

"रिक्वेस्ट अशी असते?"

"त्याचे असे आहे की रिक्वेस्ट करायला मी दोन तासापूर्वीच शिकलो आहे. दोन तासापूर्वी भेटला असता तर रिक्वेस्ट न करताच काम करायला लावले असते."

डॉक्टरने नकळत खिशातून रुमाल काढून कपाळावरील घाम पुसला. निराशेने मान हलविली आणि म्हणाला,

“चला, आधी समीरला बघू.”

समीरचा रक्तस्त्राव थांबला होता. तो हळूहळू शुद्धीवर येत होता.

“समीर, समीर.” कबीरने हाक मारली. त्याने हळूवारपणे डोळे उघडले.” तुला सातच्या विमानाने हिन्दुस्थानला जायचे आहे.”

“या अवस्थेत?”सुलेखा म्हणाली.

“मी पण तेच म्हणतो पण हे ऐकायला तयार नाही.” डॉक्टर म्हणाला

“बरोबर नर्स असली तर?” कबीर रेटून म्हणाला.

डॉक्टर जरा विचारात पडला,” मग ठीक आहे पण इतक्या कमी वेळात नर्सच काय पत्नी पण जायला तयार होणार नाही.”

“त्याची पत्नी कम नर्स तयार आहे. ती काय तुमच्या बाजूला उभी आहे.”सुलेखाकडे बोट दाखवित कबीर म्हणाला. त्याही परिस्थितीत सुलेखा लाजली.

“पण पेपरवर्क?”

“हॉस्पिटलचे तुम्ही द्या. बाकीचे मी बघतो.”

आता डॉक्टरला पण उत्साह आला. तो म्हणाला,”ठीक आहे. आमचा कलकत्त्याच्या (आताचे कोलकता) रॉयल हॉस्पिटलशी टाय-अप आहे. तिथे याला पाठवता येईल. अर्थात नर्स बरोबर.”

समीरच्या कानाशी वाकून कबीर म्हणाला,” तू सर्व ऐकत आहे ना? आपल्याला पेपर्स कोणाकडून मिळू शकतील?”

तिघेही आतुरतेने समीरकडे बघू लागते. क्षणभर समीर काहीच बोलला नाही. कबीरला शंका वाटू लागली की परत बेशुद्ध होतो की काय? तोच समीर अतिशय हळू आवाजात म्हणाला,” तेजींदर. फोन नं 2*******9 भारतीय दूतावास.” कबीर ताबडतोब फोन करायला गेला. मध्यंतरीच्या काळात सुलेखाने हॉटेल वरून समीरचे सामान आणायची व्यवस्था केली तसेच स्वतःचे पण आवश्यक सामान घेतले. सकिनाला परिस्थितीची पूर्ण कल्पना दिली.

रात्री चार वाजता तेजींदरचा फोन घणघणला. काहीश्या पेंगुळलेल्या आवाजातच तेजींदरने फोन उचलला.

“तेजींदर हिअर.”

पलिकडून कबीरने आपली ओळख सांगितली आणि समीरचा संदर्भ देत परिस्थिती वर्णन केली. त्याचबरोबर त्याला तातडीने हिंदुस्थानात पाठविण्याची गरज विशद केली.

“आता कसा आहे तो.”त्याने विचारले.

“तो ठीक आहे पण सात वाजता तो विमानात बसला पाहिजे त्याकरता जे काही करायचे ते तातडीने केले पाहिजे. त्याच्याबरोबर एक नर्स पण जाणार आहे.”

“ही कोण आणखी?”

“सुलेखा, त्याची पत्नी.”

“माझ्या माहिती प्रमाणे त्याचे लग्न. . . .”

“ते सर्व मी तुम्हाला प्रत्यक्ष भेटीत सांगेन. आता जर आपण घाई केली नाही तर हे प्रकरण उगीच वाढेल आणि नंतर ते रोखणे आपल्या हातात राहणार नाही.”

“तुम्ही सर्वजण सरळ दूतावासातच या. मी सर्व पेपर्स तयार ठेवतो.”

अर्ध्या तासात कबीर, सुलेखा आणि समीर दूतावासात पोचले. पोर्चमधेच तेजींदर उभा होता. त्याने समीरला बघताच हाय हॅलो केलेच. पेपर्स तयार होतेच. ते त्याने सुलेखाला नीट समजावून सांगितले आणि ऑल द बेस्ट म्हणून निघाला.” थँक्स तेजींदर.”समीर हळूच म्हणाला. तेज़ींदरने मागे वळूनपण बघितले नाही.

“थँक्स यार.”समीर किंचित मोठ्याने म्हणाला. आता मात्र तेज़ींदरने पटकन मागे वळून बघितले.

“अबे कमीने, कमाल करता है. यार कहता है और थँक्स भी बोलता है. फिर दोस्त किसलीये होते हैं.” असे म्हणून तो गेला पण.

विमानतळाच्या दुसऱ्या गेट मधून आत जाताच एक स्ट्रेचर घेऊन दोन सेवक धावतच आले. समीरला त्यावर झोपवून ते पळतच विमानात शिरले. कबीरपण बरोबर होताच. स्ट्रेचर जागेवर नीट ठेवल्यावर आणि सुलेखा जवळ बसल्यावर एअर होस्टेस कबीरजवळ येऊन म्हणाली,” सर प्लिज.” आणि दरवाज्याकडे हात केला.

“एक मिनिट.” कबीर म्हणाला आणि समीरच्या कानाजवळ तोंड नेत मोठ्याने म्हणाला,”परत भेटू नकोस.”

----------*----------

# प्रकरण १३

नंतरच्या घटना म्हणजे आधी जे काही घडले त्याचे पडसाद होत्या.

समीर आणि सुलेखा कलकत्त्याला पोचल्यावर जय, राधिका आणि तपन घ्यायला आले होते. राधिका खरे तर खूप रागावली होती पण समीरची स्थिती आणि सुलेखाला बघून सर्व विसरली.

समीर चारच दिवसात बरा झाला. त्यात चांगल्या सुश्रुषेचा भाग किती आणि सुलेखेचा भाग किती हा संशोधनाचा विषय आहे. नंतर आठ दिवसात समीर आणि सुलेखा यांचे लग्न साधेपणाने साजरे झाले.

समीरने खुप आग्रह केला पण सकिना काही भारतात यायला तयार झाली नाही.

कबीर यथावकाश आय. जी. झाला आणि वेळ मिळाला तर 'अँगर मॅनेजमेंट' वर व्याख्यान देतो.

बोलून प्रश्न सुटतात असे तो ठामपणे समोर बसलेल्या अधिकाऱ्यांना सांगतो. दरवर्षी एकदा पत्नीसमवेत मुलीकडे जाऊन येतो. त्याच्या नातवाचे नाव त्याने 'समीर'ठेवले आहे.


हमीर ग्रुपची मॅनेजमेंट पूर्ण बदलली आहे. रफीक आणि मकबूल तिथे मॅनेजर म्हणून कार्यरत आहे.


बंगलादेशचा ट्रॅफिक जामचा प्रॉब्लेम मात्र आहे तसाच आहे कारण समीरच्या रिपोर्टवर काही विशेष कारवाई झाली नाही. दळणवळण सुधारले तरी सायकल रिक्षा बंद करणे किंवा टप्प्याटप्प्याने हटविणे अजून तरी काही शक्य झाले नाही.

समीरने तेजींदरचे आभार मानणारे एक पत्र ढाक्यातील भारतीय दूतावासाच्या पत्त्यावर लिहिले. सात दिवसात त्याला दूतावासाकडून त्याचे उत्तर आले. ‘या नावाची कोणीही व्यक्ती दूतावासात काम करीत नाही’ एवढेच त्यात लिहिले होते.

----------*----------


समाप्त





कव्हरवर फ़क्त एक क्लिक करताच पुस्तक उघडेल.



# ई साहित्य प्रतिष्ठानचे हे १५ वे वर्ष.

# जगदिश खांदेवाले यांचे हे सहावे पुस्तक.

जगदिश खांदेवाले यांच्या कथा वास्तवाशी जवळिक साधणाऱ्या, मनोरंजक आणि वैविध्यपूर्ण असतात. ते लिहितात कमी. पण जे लिहितात ते सकस, जोमदार, आणि भरीव असते. त्यामुळे ते वाचकांच्या मनाची पकड घेते. त्यांच्या पुस्तकांवर असंख्य वाचकांचा प्रतिसाद येतो आणि त्यात एक गोष्ट आवर्जून सांगितली जाते. ती म्हणजे"तुमचे पुस्तक हातात घेतल्यावर पुर्ण केल्याखेरिज खाली ठेवता येत नाही". त्यांच्या पुस्तकांना भरपुर मागणी आहे. पण ते अत्यंत मेहनतीने लिहीलेली आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील वाचकांना विनामूल्य देतात.

असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर ई साहित्यवर दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले(९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद(१४), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(९), डॉ. नितीन मोरे (३८), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(१२), अनंत पावसकर(४), मधू शिरगांवकर (८), अशोक कोठारे (४७ खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (८), डॉ.

वृषाली जोशी(३५), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे(२२), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(६) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट(२), अरुण कुळकर्णी(१२), जगदिश खांदेवाले(६) पंकज कोटलवार(६) डॉ. सुरुची नाईक(३) डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे(९), श्याम कुलकर्णी(७), किशोर कुलकर्णी, रामदास खरे(४), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक(२), मंगेश चौधरी, प्र. सु. हिरुरकर(२), बंकटलाल जाजू (३), प्रवीण दवणे, आर्या जोशी असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमुर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं 'इ'यें ।

दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।